# १९५७

च्या

# क्रांतीचा उषःकाल

अर्थात

# भूदान-यज्ञाचें नवसंस्करण

नोबा ]

REFBK-0011500
म.
विषय निबंध
सं. क्र. 9269

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रमांक २८१३४ वि: निबंध
क्रमांक ९२८ नों. दि: १५।२।६१

# निवेदन

ता. १९ ते २२ नोव्हेंबर १९५६ ला मदुरा जिल्ह्यांतील पळणीं गांवीं पू. विनोबांच्या उपस्थितींत अ. भा. सर्व-सेवा-संघाची बैठक झाली त्यांत ता. २० आणि २१ ला पू. विनोबांची दोन भाषणें झालीं. त्याचा च परिणाम म्हणजे सर्व-सेवा-संघानें घेतलेले क्रांतिकारी निर्णय. यापुढें भूदान-यज्ञ आंदोलन नवीन पर्वांत प्रवेश करीत आहे.

ही छोटीशी पुस्तिका पळणीला 'निधि-मुक्ति' आणि 'तंत्रमुक्ति' चे जे क्रांतिकारी निर्णय घेतले, त्याच्या पाठीमागील विचाराचें स्पष्ट दर्शन करवून देण्याला उपयोगी होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें
वा. क्र. ११५००
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

**प्रकाशक**

REFBK-0011500

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सर्वोदयाची निष्ठा | १ |
| २ | अहिंसक क्रांतीची प्रेरणा | २८ |
| ३ | क्रांतीची प्रक्रिया | ३७ |
| ४ | निधि कीं राम-सन्निधि | ४० |
| ५ | लोक-सेवकाची प्रतिज्ञा | ४५ |
| ६ | कार्यकर्त्यांच्या योजनेचे अष्टविध प्रकार | ४६ |
| | **परिशिष्ट :** | |
| | (१) सर्व-सेवा-संघाचे ठराव | ५० |
| | (२) पुढील कार्याचा सर्व-सेवा-संघाचा आराखडा | ५३ |

# १९५७

च्या

• • •

# क्रान्तीचा उषःकाल

• • •

विनोबा

• • •

परंधाम विद्यापीठ प्रकाशन

प्रकाशक:
भाऊ पानसे
ग्राम-सेवा-मंडळ
परंधाम विद्यापीठ
पो० पवनार वर्धा

● ● ●

किंमत चार आणे

● ● ●

मुद्रक:
मोहनलाल भट्ट
राष्ट्रभाषा प्रेस, वर्धा

● ● ●

: १ :

# सर्वोदयाची निष्ठा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रा. क्र. 998500

**ताज्या घटनांचा परामर्श**

धर्मपुरीला तीन महिन्यांपूर्वी आपण जमलों होतों त्यानंतर आतां जमत आहोंत. या तीन चार महिन्यांत जगामधें आणि हिंदुस्थानामधें कित्येक अशा घटना घडल्या आहेत कीं त्यांमुळें प्रत्येकाच्या हृदयांत तीव्र प्रतिक्रिया झाली.

इंग्लंडच्या सबंध इतिहासांत हा पहिला च प्रसंग म्हणतां येईल कीं आपल्या पक्षाच्या बहुमताच्या जोरावर राष्ट्राची संमति न घेतां दुसऱ्या देशावर इंग्लंडनें चढाई केली. लोकशाहीच्या दृष्टीनें ही अत्यंत चिंताजनक घटना आहे. त्यांतल्या त्यांत आशादायक लक्षण हें दिसून आलें कीं इंग्लंडच्या जनतेनें आपला तीव्र असंतोष स्पष्ट आणि जोरदार शब्दांत प्रकट केला. तसें च हंगेरीमधें जें काय झालें तें हि अत्यंत चिंताजनक आहे. तेथील पुष्कळशा गोष्टी आपल्याला पूर्णपणें अजून कळल्या हि नाहींत.

अशा रीतीनें जगाची एकूण भयानक स्थिति आहे. कधीं ती दृष्टिगोचर होते तर कधीं होत नाहीं परंतु ती आहे भयानक च.

आपल्याकडे हिंदुस्थानचा विचार केला तर राज्य-पुनर्रचना-मंडळाच्या अहवालापासून आणि विशेषतः गेल्या तीन चार महिन्यांत ज्या घटना घडल्या त्या हि तितक्या च चिंताजनक आहेत. त्यांतल्या त्यांत अहमदाबादची घटना पाहतां मला कबूल

---

[ **पळणी** येथें २०-११-५६ रोजीं स. से. संघाच्या बैठकीसमोर झालेलें व्याख्यान ]

केलें पाहिजे कीं ती माझ्या कल्पनेबाहेरची गोष्ट घडली. बिहार सोडल्यास हिंदुस्थानांत विशेष अहिंसापरायण जनता गुजराथची म्हणतां येईल. गांधीजीमुळें हि गुजराथची एक निष्ठा बनली. असें असून अहमदाबादची घटना घडली.

**गोळीबाराची चौकशी नाहीं**

या घटनांचा मी उल्लेख करतों तेव्हां दोन्ही पक्षांकडून ज्या गोष्टी घडल्या त्यांबाबत मी बोलतों आहें. गोळीबार झाला. तो करणें कर्तव्य होतें असें मानून झाला. त्यानंतर त्याची चौकशी करण्याची गरज वाटली नाहीं. केवळ अहमदाबाद किंवा मुंबईच्या गोळीबाराबाबत च मी हें म्हणत नाहीं. गेल्या सात-आठ वर्षांत मुंबई राज्यांत दहा वीस वेळां तरी गोळीबार झाला. मी भीत भीत कमी च आंकडा सांगून राहिलों आहे. परंतु फार च थोडचा प्रसंगीं चौकशी झाली. आणि दु:खाची गोष्ट ही कीं हे सर्व प्रकार आमच्याहून कोणी वेगळे लोक करीत नाहींत, आम्ही च करीत आहोंत. आम्ही म्हणजे गांधीजींची शिकवण मान्य असणारे, असें मला म्हणायचें आहे. यांत व्यक्तिश: मी किंवा दुसरा कोणी जबाबदार आहे कीं कसें या विचारांत पडण्यामधें सार नाहीं.

**अहिंसेसाठीं हिंसेचें समर्थन**

आपल्या मंडळींत असा एक विचार दिसून येतो कीं अहिंसेसाठीं च असा गोळीबार अवश्यक आहे. हा विचार फार जुना आहे. अहिंसेच्या बाजूनें जितके आधार शास्त्र-वचनांत दाखवितां येतील तितके च या विचाराच्या अनुकूल हि दाखवितां येतील. आणि हें साऱ्या दुनियेच्या आध्यात्मिक आणि धार्मिक ग्रंथांत दिसून येईल. राजनैतिक क्षेत्रांत तर सोडून च द्या परंतु धार्मिक क्षेत्रांत हि अहिंसेच्या नांवावर अशा हिंसेचें समर्थन करणारीं विधानें आहेत.

आणि तो गोळीबाराचा किंवा हिंसेचा बचाव नव्हे तर अहिंसेचा च बचाव मानण्यांत येतो.

परंतु शास्त्राच्या आधारें किंवा आजच्या परिस्थितीच्या आधारें प्रसंगीं गोळीबार करणें योग्य आहे असें मानलें गेलें तरी हा सर्वोदयाचा किंवा गाधीजींचा विचार आहे असें आपण मुळीं च म्हणू शकणार नाहीं. मी जेव्हां केव्हां गांधीजींच्या नांवाचा उल्लेख करतों तेव्हां मनाला फार संकोच वाटतो. परंतु तें नांव मी टाळू शकत नाहीं. मुलाला वाटत असतें कीं आपण आईचें काम करावें, उगीच आईचें नांव घेऊं नये. परंतु आईच्या नांवाचा आधार घेऊन जेव्हां एखादी गोष्ट केली जाते तेव्हां आईचें नांव घेऊन बोलावें लागतें. गांधीजी असते तर कदाचित या गोळीबाराचा त्यांनीं बचाव केला असता किंवा त्याला पाठिंबा दिला असता अशा सारख्या वादांत पडायचें आपल्याला कारण नाहीं. ज्यांना तसें वाटत असेल त्यांना तसें मानण्याचा अधिकार आहे. परंतु मला जें वाटतें तें मानण्याचा मला हि अधिकार आहे. मला असें वाटतें कीं ही गोष्ट गांधी-विचाराच्या सर्वस्वी विरुद्ध आहे. गांधी-विचार सोडून दिला तरी कोणत्या हि दृष्टीनें ही वस्तु माझ्या चित्तांत बसत च नाहीं. महाभारतांत या विषयाचा फार बारीक ऊहापोह केलेला आहे. सबंध महाभारत वाचून हि मी या गोष्टीचा बचाव करूं शकत नाहीं कीं गोळीबार व्हावा आणि त्याची चौकशी होऊं नये. मी कोणाला कांहीं सल्ला देण्याच्या भानगडींत पडत नाहीं. मीं तर एकदां म्हटलें होतें कीं चोरानें चोरी केली तर त्याला तीन वर्षें कैदेची शिक्षा देण्याऐवजीं तीन एकर जमीन द्यावी. म्हणून कोणाला शिक्षा वगैरे करावी या विचाराचा मी नाहीं. तथापि एखाद्या वस्तूवर अशा रीतीनें पांघरूण घातलें जावें,

वारंवार तिचा बचाव केला जावा, बचाव करतांना चुकीचा युक्तिवाद केला जावा हें सर्व पाहून चित्ताला वेदना होतात. लोकांकडून हिंसा झाली हें कबूल. परंतु लोक शेंवटीं लोक च आहेत. प्रजा या नात्यानें च त्यांना तोललें जाईल. परंतु जे जबाबदार पुढारी, राज्यकर्ते किंवा समाजाचे सेवक आहेत त्यांची विशेष जबाबदारी मानली जाईल. आणि त्यांच्या च कडून असे प्रकार व्हावेत आणि त्यांचें समर्थन केलें जावें हें पाहून दुःख होतें.

**पक्षनिष्ठा कीं सत्यनिष्ठा**

आणि विशेष दुःखाची गोष्ट ही कीं या जबाबदार काँग्रेसच्या लोकांत आमचे असे हि कांहीं लोक आहेत कीं ज्यांच्या हातीं सत्ता आहे आणि जे व्यक्तिशः कबूल करतात कीं गोळीबाराची चौकशी झाली पाहिजे, परंतु जाहीर रीतीनें ते असें बोलूं शकत नाहींत. या गोष्टींत जी सत्याची हानि मला दिसते ती गोळीबारांतील मनुष्यहानीहून अधिक भयानक आहे. मी याबद्दल व्यक्तिशः त्यांना दोष देत नाहीं. कारण पक्षनिष्ठेचें हें एक अंग आहे असें त्यांना वाटतें. "पार्टीची एक निष्ठा असते. आपल्या पार्टीनें एखादें चुकीचें काम केलें तर त्याबद्दल आपसांत चर्चा करायला हरकत नाहीं, परंतु पक्षप्रमुख जर ती गोष्ट मान्य करीत नसेल तर चर्चा तिथें च सोडून द्यावी. आम जनतेंत जाऊन बोलूं नये किंवा पक्षाच्या विरुद्ध आपलें मत प्रकट करूं नये." असें पक्षनिष्ठा सांगते. पक्ष बनविण्यासंबंधीं आधींपासून च माझ्या मनांत प्रतिकूल भावना होती. परंतु हें सर्व पाहिलें तेव्हां ती भावना अधिक च दृढ झाली.

पक्षनिष्ठेचा विचार करतां आपलें मन जाहीर रीतीनें प्रकट न करणें यांत एक मर्यादित सत्यनिष्ठा आहे हा त्यांचा विचार ग्राह्य मानला तरी अशी मर्यादित सत्यनिष्ठा परम सत्याचा छेद

करणारी आहे आणि म्हणून तिचा त्याग च केला पाहिजे. सज्जनांना न कळत दुर्जन बनविणारी ही पक्षनिष्ठा मला अत्यंत भयानक वाटते. ती एक माया आहे. तिच्यामुळें सत्यावर आणि अहिंसेवर फार मोठा आघात झाला आहे, असें मला वाटतें.

अशा स्थितींत हिंदुस्थानचा आवाज आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत अहिंसेच्या बाजूनें परिणामकारक ठरला पाहिजे इत्यादि ज्या आमच्या अपेक्षा आहेत त्या मला फोल वाटतात. येथील आमच्या या कृत्यांमुळें जगावर आमच्या आवाजाचा कांहीं एक परिणाम होणार नाहीं. कॅमोफ्लाजचें किंवा ढोंगाचें हि एक तंत्र आहे. परंतु तें हिंसेच्या क्षेत्रांत. अहिंसेच्या योजनेंमधें त्याचा कांहीं च उपयोग नाहीं. ज्या अहिंसेंत सत्य असतें ती च अहिंसा परिणामकारक ठरते.

**आमची शांतीची भूक खरी हवी**

पुष्कळ वेळां असें सांगण्यांत येतें कीं हिंदुस्थानसारखे आशियाचे जे मागासलेले देश आहेत त्यांच्या विकासासाठीं जगांत शांतता नांदणें अवश्यक आहे. विश्वयुद्ध सुरू झालें तर त्या देशांचा सर्व विकास थांबेल. म्हणून जरी नेहमीं च शांतता नांदावी अशी आमची इच्छा आहे तरी निदान १०–१५ वर्षें तरी विश्वशांतीची अत्यंत अवश्यकता आहे असें बोललें जातें. मला तर हें बोलणें हि धोक्याचें वाटतें. ही शांतीची भूक नसून देशाच्या विकासाची भूक आहे. तिकडे लक्ष ठेवून शांति नांदावी म्हणून आपण बोलूं लागलों तर जगावर त्या बोलण्याचा नैतिक परिणाम तो काय होणार ?

गोव्याचा प्रश्न घ्या. दिसायला तो लहानसा प्रश्न वाटतो. परंतु तो फार खोल आहे. किती तरी समस्या त्या एका प्रश्नांत गुंतलेल्या आहेत. आम्ही गोव्यावर आक्रमण करूं इच्छीत नाहीं.

जरी बोललें मात्र जातें कीं आक्रमण केलें तर आम्ही गोवा सहज जिंकून घेऊं. मला त्याबद्दल हि शंका वाटते. तें वाटतें तितकें सोपें नाहीं. अनेक अन्य शक्ति गोव्याच्या आड काम करीत आहेत. परंतु तें मी सोडून देऊन मान्य करतों कीं आक्रमण केल्यास आपण गोवा जिंकून हि घेऊं. परंतु आमची अहिंसेची नीति असल्यामुळें आम्ही गोव्यावर आक्रमण करीत नाहीं या बोलण्यांत हि विशेष शांतीची उत्कटता भरली आहे असें मला वाटत नाहीं. कारण पीसफुल मेझर ज्याला म्हणतात (शांतिमय उपाय-योजना) तें आम्हीं केलें आहे. आम्ही गोव्याची बाऊंडरी सील केली (सीमा बंद केली) आहे म्हणतों. त्यामुळें गोव्याशीं बराचसा व्यवहार बंद पडला आहे. आतां ही उपाययोजना शांतिमय म्हटली तरी हिच्यांत अहिंसेची ताकद नाहीं. समोरच्या पक्षाविषयीं प्रेमानें प्रेरित होऊन आम्हीं हें केलें असें म्हणतां येत नाहीं. आपण करीत असलेल्या उपाययोजनेच्या मागें दोषी समजल्या गेलेल्या व्यक्तीविषयीं जेव्हां प्रेमाची भावना असते तेव्हां च अहिंसेची शक्ति प्रकट होते. आपल्या उपाययोजनेनें आपलें भलें तर होईल च परंतु समोरच्याचें हि भलें होईल आणि त्याच्या उन्नतीसाठीं ही उपाययोजना अवश्यक आहे अशी जिथें स्पष्ट भावना असते तिथें अहिंसेची शक्ति प्रकट होते. प्रत्यक्ष चढाई जरी केली नाहीं तरी केवळ बहिष्कार इत्यादि निषेधात्मक उपाय करून शांतीची शक्ति कधीं च प्रकट होणार नाहीं.

### गोळीबाराविरुद्ध प्रभावी लोकमत कां प्रकट झालें नाहीं ?

हिंदुस्थानांतील किती वर्तमानपत्रांनीं गोळीबाराचा स्पष्ट शब्दांत निषेध केला ? चार दोन वर्तमानपत्रांनीं निषेध केला परंतु त्या निषेधाची पर्वा केली गेली नाहीं. कारण सरकारवर नेहमीं

टीका च करण्याची त्यांची ख्याति आहे. बाकीचे सर्व या बाबतींत मूग गिळून बसले. ही जी वृत्ति हिंदुस्थानांत दिसून येते ती अहिंसेची शक्ति निर्माण करण्याला पोषक नाहीं.

**आमची जबाबदारी**

अशा स्थितींत आपण जे इथें जमलों आहोंत त्यांच्यावर विचार करण्याची जबाबदारी येते. अहिंसेच्या वृत्तीचा परिपोष कधीं होणार आहे कीं नाहीं ? या गोष्टीचें चिंतन झालें पाहिजे. आज दिसत असलेल्या परिस्थितींतून आपण अहिंसेची ताकद प्रकट करून दाखविणार आहोंत कीं कसेंबसें निभावून टिकून राहणार आहोंत ? केवळ निभावून जाण्याचा च प्रश्न असेल तर तें शक्य होईल. कारण कोणतें हि सरकार सज्जनांचा नेहमीं च बचाव करून घेतें आणि त्यांना पचवून हि टाकतें. त्या सज्जन समाजाला अपवाद मानून पुढें चलण्यास हि तें तयार असतें. आम सैन्य-भरतीच्या वेळीं युद्धाला प्रामाणिक विरोध करणारांचा अपवाद इंग्लंडमधें केला जातो हें आपण पाहतों च. तसें सरकार आमच्या-पुरता अपवाद करील आणि आम्ही आजच्या परिस्थितींतून निभावून हि जाऊं. परंतु त्यानें अहिंसेची शक्ति हिंदुस्थानांत प्रकट करण्याचें काम होणार नाहीं.

**गांधीजींच्या समाधीसमोर शस्त्र-प्रदर्शन**

नुकतें च प्यारेलालजींचें मला पत्र आलें. त्यांत त्यांनीं आपल्या हृदयांतील वेदना प्रकट केली आहे. ३० जानेवारीच्या दिवशीं दिल्लीला बापूंच्या समाधीसमोर अनेक लोक येऊन प्रणाम करून जातात. त्यांत लष्करांतील कांहीं लोक आपापल्या शस्त्रांसह वंदन करण्यास येतात. प्यारेलालजी विचारतात कीं ज्याला आपण अहिंसेचा युगावतार मानतों अशा पुरुषाला आदराची अंजलि

अर्पण करतांना तरी या लोकांनीं आपलीं हत्यारें घरीं ठेवून येणें उचित नाहीं कां ? दुसरी गोष्ट त्यांनीं ही लिहिली आहे कीं उत्तर प्रदेशचें सरकार शाळांतून लष्करी शिक्षण दाखल करण्याचा गंभीरपणें विचार करीत आहे असें ऐकण्यांत येतें. तरी याबद्दल मीं (विनोबांनीं) चौकशी करावी. या बातमींत कितपत तथ्य आहे मला माहीत नाहीं. परंतु आमच्या डोळ्यादेखत हिंदुस्थानांत उद्यां जर शाळेंत लष्करी शिक्षण सुरू झालें तर मला आश्चर्य वाटणार नाहीं. आम्ही आमच्यापुरतें त्यांतून अलग राहूं कदाचित् परंतु आम लष्करी शिक्षण हिंदुस्थानांत दाखल होऊं न देण्यांत आम्ही असमर्थ ठरलों तर अहिंसेची शक्ति प्रकट होण्याची आशा च नाहीं.

**सत्याग्रह वज्रकवच**

म्हणून आमच्या सत्याग्रहाची प्रक्रिया सौम्य, सौम्यतर, आणि सौम्यतम असली पाहिजे असें मीं मागें म्हटलें होतें. सत्याग्रह हें आपलें वज्रकवच आहे. त्याची प्रक्रिया कोणती असावी या बद्दलचें संशोधन अशा संमेलनांत व्हायला पाहिजे. इतर हि प्रसंगीं याबाबत चर्चा करून अहिंसेच्या परिभाषेंत या समस्येवर कांहीं तोड आहे कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. तोड जरूर असली पाहिजे. कारण अहिंसेंत प्रत्येक समस्येला उत्तर आहे. तें उत्तर शोधून काढण्यासाठीं आपल्याला अधिकाधिक सौम्य आणि मृदु बनलें पाहिजे.

**अंतिम श्रद्धा कशावर ?**

या बाबत अहिंसक सेना, शांति-सेना, वगैरेच्या सूचना मंडळींनीं केल्या आहेत. हरिभाऊंची दोन तीन पत्रें हि मला आलीं आहेत. त्यांचें म्हणणें असें कीं लष्कर येऊन कांहीं कारवाई करण्यापूर्वीं आपल्या शांतिसेनेनें गडबडीच्या ठिकाणीं जाऊन लोकांना शांत

करण्याचा प्रयत्न करावा. त्यांना यश न मिळालें तर च लष्करानें जावें. परंतु अशा प्रकारचा विचार माझ्या मनाला फार च क्लेश-दायक वाटतो. या विचारांत अंतिम श्रद्धा हिंसेवर आहे. म्हणजे हिंसा परमेश्वरस्वरूप झाली. सर्व प्रयत्न संपले म्हणजे आपण ईश्वराला शरण जातों. अहिंसेचा प्रयोग करून पहायचा, न जमलें तर नाइलाजानें हिंसा करावी लागेल असें मानायचें, आणि त्यानें च कार्यसिद्धि होईल असा विश्वास ठेवायचा, अशी स्थिति आमच्या समाजांत आज आहे. म्हणजे ही दोन प्रकारची श्रद्धा झाली. इतर उपाय थकले तर हिंसेचा उपाय करावा लागेल आणि केला पाहिजे ही एक श्रद्धा आणि तात्कालिक कां होईना पण हिंसेच्या च उपायानें काम होईल ही दुसरी श्रद्धा. दोन्ही मिळून भावार्थ एक च. हिंसे-वर श्रद्धा. ती आज सर्वत्र दिसत आहे.

अशा स्थितींत आपल्याला अशी सेना तयार केली पाहिजे कीं जी कांहीं विशिष्ट गुण आपल्या अंगीं बाणून घेईल. असा गुणाभ्यास चालू असतांना आजच्या आज अहिंसेचा कितपत अंमल करतां येईल, चारी बाजूला हिंसा चालू असतांना समाजाच्या एखाद्या भागाचें जीवन तिच्यापासून कितपत निर्लिप्त ठेवतां येईल, त्या हिंसेचा प्रतिकार करूं शकणारी एखादी स्वतंत्र शक्ति आप-ल्याला कशी निर्माण करतां येईल, इत्यादि सर्व विषयांवर आपण विचार केला पाहिजे.

**अपरिग्रहाची गरज**

अहिंसा आणि सत्य या दोन गोष्टी मीं तुम्हांला सांगितल्या. मला वाटतें कीं त्यांबरोबर अपरिग्रहाचा हि उल्लेख केला पाहिजे. सत्य आणि अहिंसा यांत अपरिग्रह अध्याहृत च आहे. तथापि त्याची अध्याहृतता न ठेवतां त्यासाठीं स्वतंत्र आयोजन केलें

पाहिजे. आज भूमिदानाचें वातावरण सबंध हिंदुस्थानांत न म्हटलें तरी कांहीं प्रांतांत बरें च निर्माण झालें आहे. बिहारसारख्या ठिकाणीं जें काम झालें तें आज जनतेंत विशिष्ट भावना उत्पन्न झाल्यामुळें च झालें. त्याशिवाय लाखों लोकांनीं दानपत्रें दिलीं नसतीं. संपत्तिदानाचीं दानपत्रें हि खूप मिळालीं आहेत. असें असून कायदा करण्याची ज्यांच्यावर जबाबदारी आहे ते कायदा करण्यास कचरत आहेत. कायद्याची जरूर नाहीं असें म्हणून त्या लोकांनीं सहा महिन्यांत भूदान पुरें करायचा संकल्प केला असता आणि ते कामाला लागले असते तरी समजूं शकण्यासारखें होतें. परंतु ती हिंमत किंवा तसा कार्यक्रम त्यांचा दिसत नाहीं. भूदानाचें काम चांगलें मानत असून हि कायदा करण्यांत त्यांचें मन कां कचरतें ? बोलतांना कोणत्या हि क्रांतिकारकापेक्षां ते कमी बोलणार नाहींत. परंतु प्रत्यक्ष आचरण करण्यांत कचरतात. याचें कारण काय ? कारण हें च कीं कायदा करण्याचें काम ज्यांच्या हातीं आहे ते सगळेच्या सगळे परिग्रहाचा सिद्धांत मान्य करणारे आहेत. परिग्रह जितका वाढेल तितका चांगला असें हि ते मानतात. आपल्या जवळचा परिग्रह सोडण्याची त्यांची इच्छा नाहीं. त्यामुळें मग अवांतर मुद्दे उपस्थित करून म्हणतात कीं वाटपाचा सिद्धांत भूमीपुरता च कां ? संपत्तीला तो कां लागूं करायचा नाहीं ? इत्यादि इत्यादि. त्यामुळें भूमिवाटपासारखें सहज होण्यासारखें काम हि लवकर पुरें होतांना दिसत नाहीं.

**कार्यकर्त्यांनीं आपलें जीवन तपासावें**

जे भूदानाचा विचार मान्य करतात त्यांनीं हि आपल्या जीवनाचें परीक्षण करावें. ज्या लोकांनीं आज अधिकार-ग्रहण केलें आहे त्यांच्या जीवनाचें आजचें मान अधिकार ग्रहण करण्या-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत. अनुक्रम 2/725 वि: निबंध क्रमांक

पूर्वी जेवढें होतें त्यापेक्षां वाढलेलें दिसतें. परंतु आम्हीं जर अधिकार-ग्रहण केलें तर त्यांच्यापेक्षां आमचें जीवनमान कमी च राहील असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. म्हणून अपरिग्रहाचा सिद्धांत मौलिक समजून आपल्या जीवनांत त्याचा अंमल केला पाहिजे. भूदान, संपत्तिदान, इत्यादींच्या मुळाशीं अपरिग्रहाचा च सिद्धांत आहे. त्याकडे आपलें लक्ष असलें पाहिजे.

कार्यकर्त्यांची आपण जी व्याख्या करतों तींत या अपरि-ग्रहाच्या सिद्धांताचा समावेश केला पाहिजे. तशा प्रकारच्या जीवनाचें शिक्षण देणारें केंद्र प्रत्येक प्रांतांत एकेक असलें पाहिजे. त्या ठिकाणीं कार्यकर्ते घेतले जावेत आणि अपरिग्रहाचें जीवन कसें जगावें याचें शिक्षण त्यांना दिलें जावें. चार सहा महिन्याचा कां होईना पण असा कांहीं कार्यक्रम असला पाहिजे. आज अण्णा सहस्रबुद्धे आपला अनुभव सांगत होते. कोरापुटला जाऊन त्यांना एक वर्ष झालें. या अवधींत ते अशा निर्णयावर आले आहेत कीं जीवनांत शरीर-परिश्रम दाखल केल्याशिवाय आदिवासी लोकांवर परिणाम करणें किंवा त्यांच्याशीं संपर्क वाढविणें शक्य नाहीं. त्यांची भाषा हि आम्हांला येत नाहीं. आणि भाषा आली तरी केवळ बोलण्यानें फारसा परिणाम हि होणार नाहीं. परिणाम करण्यासाठीं त्यांच्याबरोबर शरीरश्रमांत च आपल्याला दाखल झालें पाहिजे. त्यांचें हें म्हणणें मीं मान्य करून एक गोष्ट आणखी जोडून दिली. ती ही कीं आपण जर त्यांना कांहीं गोष्टी शिक-वायला जाणार असूं तर आधीं त्यांच्यापासून शिकण्याची तयारी केली पाहिजे. आपण त्यांचे शिष्य बनूं तर च त्यांचे गुरु बनूं शकूं. त्यांच्यांत शरीरश्रमाचा फार मोठा गुण आहे तो आधीं आपण ग्रहण केला पाहिजे.

### निष्काम-सेवा उरली नाहीं

आज हिंदुस्थानांत ज्या अनेक आपत्ति आहेत त्यांत आध्यात्मिक आपत्ति ही आहे कीं निष्काम सेवा उरली नाहीं. जी काय सेवा केली असेल तिचा मोबदला अपेक्षिला जातो. व्यक्तिगत म्हणा किंवा पक्षगत म्हणा. पक्षगत अपेक्षा असली तर ती निरपेक्ष आहे असें कोणी म्हणेल. परंतु खरें पाहतां ती निरपेक्ष नाहीं. पाक्षिक अपेक्षा ही हि सकाम च म्हटली पाहिजे. स्वराज्यापूर्वी निष्कामता थोडी दिसत होती. कारण कामनेला वाव च नव्हता. परंतु स्वराज्यानंतर तशी स्थिति राहिली नाहीं. नुकतें च एका व्याख्यानांत मीं म्हटलें होतें कीं आम्हीं सर्व धार्मिक कार्य धार्मिक संस्थांवर सोंपवून दिलें आहें आणि सर्व सामाजिक कार्य सरकारवर सोंपवून दिलें आहे. हीं दोन कामें सोडल्यावर मनुष्याच्या जीवनांत खाणें, पिणें, झोंपणें यांशिवाय कांहीं उरत च नाहीं. या दोन्ही संस्थांमार्फत होणारी सर्व सेवा सकाम च आहे.

### सकाम-सेवकांशीं सहकाराची वृत्ति

म्हणून आपल्याला आतां अशी एक सेना उभी केली पाहिजे कीं, जिचा शुद्ध सेवेवर विश्वास आहे. असे लोक थोडे मिळाले तरी त्यांचा संग्रह आपण करूं तर च काम व्यापक होईल. म्हणून कार्यकर्त्यांच्या निष्ठेमधें निष्काम-सेवेची वृत्ति हें एक अवश्यक अंग असलें पाहिजे. आणि त्याबरोबर पथ्य हें कीं सकाम-सेवा करणाराहून आपण उच्च आहोंत अशी भावना न राखणें. त्या सकाम-सेवा करणारांचा हि सहकार घेतला पाहिजे. मी असें पाहतों कीं निरपेक्ष-सेवा करणारे सकाम-सेवा करणारांच्या बरोबर काम करूं शकत नाहींत, त्यांना पचवूं शकत नाहींत. यांत त्यांच्या निष्कामतेची मी अपूर्णता पाहतों. खरी आणि पूर्ण निष्कामता

तिला म्हणतां येईल कीं जी स्वतः निष्काम राहून कामनाप्रेरित परंतु सत्कार्यांत मग्न असलेल्या लोकांचा आपल्यांत समावेश करून घेते आणि त्यांची मदत घेते. अशी वृत्ति राखून काम केलें तरं आपण असंख्य लोकांचा सहकार मिळवूं शकूं. म्हणून हा हि आदर्श आपल्या कार्यकर्त्यांसमोर असला पाहिजे.

**लोकनीतीवर श्रद्धा**

अहिंसा-सत्य-अपरिग्रह यांबद्दलची निष्ठा, आणि निष्काम सेवा व सकाम सेवकांबद्दल सहिष्णुता; या दोन गोष्टींबरोबर आणखी तिसरी गोष्ट हवी. ती म्हणजे लोकनीतीविषयीं निष्ठा. आपल्या कार्यकर्त्यांच्या निष्ठेंचें हें हि एक अवश्यक अंग आहे. सर्व-सेवा-संघानें निवडणुकीबाबत नुकता च एक फार सुंदर ठराव केला आहे. या ठरावाच्या बाबतींत किती तरी चर्चा निघूं शकतात. चर्चेला उत्तेजन देणारा च हा ठराव आहे. मतदान केलें नाहीं तर नागरिकाच्या कर्तव्याला आपण चुकलों असें नाहीं कां होणार ? अनेकांनीं जर आपलें अनुकरण केलें तर गैर लोकांच्या हातांत कारभार नाहीं कां जाणार ? इत्यादि अनेक प्रश्न विचारले जातील. तथापि एकंदरींत तो ठराव अत्यंत कल्याणकारी आहे.

**पक्षातीत सज्जन च परिणामकारी ठरतात**

जों जों मी लोकनीतीबाबत विचार करतों तों तों मला असें निश्चित वाटूं लागलें आहे कीं आजच्या राजनीतीची कल्पना मान्य करून ती आपण तोडूं पाहूं तर तें शक्य नाहीं. झाड तोडायचें तें झाडावर बसून तोडतां येणार नाहीं. म्हणून हल्लींची राजनीति तोडून पाडण्यासाठीं तिच्यांत स्वतः शिरण्याच्या कल्पनेमागें एक प्रकारचा मोह च आहे. जगाच्या आजच्या परिस्थितींत तो मी निर्दोष मानायला हि तयार आहें.

आज एकाशीं चर्चा चालली होती. तो म्हणाला "समाज-परिवर्तनासाठीं सत्ता-केंद्रांत आपला कांहीं ना कांहीं हात असला च पाहिजे." सत्तेवर अंकुश असायला पाहिजे हें मला मान्य आहे. परंतु सत्तेपासून अलग राहिल्यानें च तो अंकुश आपण चांगला राखूं शकूं.

दुसरे एक गृहस्थ म्हणाले कीं "पक्षीय राजकारणांत न पडण्याच्या तुमच्या धोरणामुळें आज जगांत जे अनिष्ट प्रकार होत आहेत त्यांवर टीका च होत नाहीं." मीं म्हटलें "खरी स्थिति उलटी आहे. आज टीका होत नाहीं याचें खरें कारण हें आहे कीं लोक पक्षांत अडकून पडले आहेत. जो मोठा पक्ष आहे तो पक्ष-निष्ठेच्या विचारानें टीका करीत नाहीं. जो विरोधी पक्ष आहे त्याच्या टीकेला कांहीं किंमत नाहीं. म्हणून पक्षातीत लोकांनीं केलेली टीका च उज्ज्वल आणि परिणामकारी होऊं शकते. त्या टीकेचा तात्कालिक परिणाम भले न होवो. परंतु नैतिक परिणाम जरूर होतो.

या ठिकाणीं अप्पासाहेब पटवर्धनांचें उदाहरण डोळ्यांसमोर येतें. राज्यपुनर्रचना मंडळाच्या वेळीं त्यांना जें योग्य वाटलें तें त्यांनीं निर्भयपणें स्पष्ट शब्दांत लोकांपुढें मांडलें. त्याची महाराष्ट्रांत फार विरोधी प्रतिक्रिया झाली. ज्या दहा पांच आदरणीय व्यक्ति महाराष्ट्रांत आहेत त्यांच्यांत अप्पांची गणना आहे. तरीपण त्यांच्या पत्रकामुळें फार विरोधी टीका महाराष्ट्रांत झाली. कोणी म्हणाले यांचें म्हणणें चूक आहे, कोणी म्हणाले महाराष्ट्राचें यानें नुकसान झालें, कोणी अप्पांना महाराष्ट्रद्रोही देखील म्हटलें. परंतु त्यांनीं व्यक्त केलेलें मत असत्-हेतुमूलक होतें असें मात्र कोणी च म्हणालें नाहीं ही विशेष लक्षांत घेण्यासारखी गोष्ट आहे. अशा टीकेचा

वातावरण थंड झाल्यावर नैतिक परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं.

**भूदान कार्यकर्ते कसे असावे**

नवीन वर्षांत आपल्यातर्फे जर भूदान समित्या बनवायच्या च झाल्या तर त्यांत अशा च कार्यकर्त्यांनीं रहावें कीं ज्यांना सर्व-सेवा संघानें आपल्यासमोर ठेवलेला आदर्श मान्य असेल आणि लोक-नीतीवर ज्यांची निष्ठा असेल. इतर सर्वांचें सहकार्य आपण जरूर घेऊं शकतों. सर्वांचें सम्मेलन हें लोकनीतीचें च एक अंग समजलें पाहिजे.

**सर्वांचा सहकार घ्या**

कांहीं लोक बाबावर हि आक्षेप घेतात कीं बाबाचा एक शंभुमेळा आहे. शंकराच्या वरातींत ज्याप्रमाणें भूत, पिशाच, प्रेत इत्यादि सर्व प्रकारचे लोक असतात तसे बाबाच्या जमातींत सर्व प्रकारचे लोक आहेत. प्रजा सोशलिस्टवाले आहेत. कम्युनिस्ट आहेत. एखादा जनसंघी हि असतो. अुत्तर प्रदेशच्या जौनपुरची गोष्ट मला आठवते. तिथें जनसंघवादी लोकांनीं खूप काम केलें आणि एक हजार एकर जमीन दानांत मिळविली. मीं त्यांच्या कामाचा गौरवानें उल्लेख केला. त्या दिवशींच्या माझ्या व्याख्यानांत वर्ण-व्यवस्थेबाबत च मीं सांगितलें. जनसंघी वर्ण-व्यवस्थेंत श्रद्धा ठेवणारे असल्यामुळें ती व्यवस्था मान्य केल्यास स्वदेशी धर्म, अहिंसा इत्यादि कसें ओघानें च मान्य करावें लागतें हें मीं दाखविलें. परंतु मीं त्यांच्या कामाचा गौरव केल्यामुळें कांहीं लोक म्हणूं लागले कीं चुकीच्या मार्गानें जाणाऱ्या लोकांचा सहयोग घेतल्यानें आपल्या कामांत हि अशुद्धि शिरण्याचा संभव आहे. परंतु तसें भय आपल्याला बाळगायचें कारण नाहीं.

### अहिंसेनें हिंसेला पचविलें पाहिजे

हिंसेमधें अहिंसेला सहन करण्याची शक्ति नसते. परंतु अहिंसेमधें हिंसेला सहन करण्याची शक्ति असली पाहिजे. हिंसक मनुष्य अहिंसक लोकांवर अनेक प्रकारचे प्रतिबंध घालून त्यांना मोकळेपणानें बोलूं देणार नाहीं. हिंसेविरुद्ध बोलणाराला भयानक मनुष्य समजून त्याची वाणी तो बंद करील. परंतु अहिंसेंत श्रद्धा असणारा मनुष्य हिंसक लोकांना जो काय प्रचार करायचा असेल तो मोकळेपणानें खुशाल करूं देईल. जीं काय व्याख्यानें द्यायचीं असतील, लेख लिहायचे असतील तें सर्व करण्यास स्टेटतर्फे मुळीं च प्रतिबंध असणार नाहीं असें तो जाहीर करील. असें झालें तर च अहिंसा उजळून निघेल. इतरांना हिंसक मानणें हा हि एक अहंकार च आहे. आणि अशा हिंसक लोकांचा संपर्क टाळण्याची वृत्ति राखणें हें पूर्वींच्या सनातनी ब्राह्मणांसारखें आहे. अशी सोवळी वृत्ति असतां कामा नये. त्या लोकांच्या सहकार्यानें भूदानाच्या चळवळीला धक्का पोंचेल असें अनेकांना वाटतें परंतु मला तसें मुळीं च वाटत नाहीं.

### अहिंसा समुद्रवत् हवी

आतांपर्यंत आपण भूदानाचें संचालन ज्यांच्या हातीं ठेवलें त्यांच्या बाबतींत असें मानलें होतें कीं ते वेगवेगळ्या पक्षांत असणारे किंवा वेगवेगळ्या मार्गांवर श्रद्धा असणारे नसावेत. परंतु त्या सर्व भूदान-समित्यांचें विसर्जन करून आपण कोरी पाटी करावी असें मीं मागें च सुचविलें होतें. त्यावेळीं तें सर्वांना मान्य होऊं शकलें नाहीं म्हणून चालू राहिलें. परंतु आतां आपण या निर्णयावर आलें पाहिजे कीं आपल्याला सर्वांचा सहयोग घ्यायचा आहे. समुद्र कोणत्या हि नाल्याचा इन्कार करीत नाहीं. केवळ शुद्ध

नदी च माझ्यामधें यावी आणि घाणेरडा नाला येऊं नये असें तो म्हणत नाहीं. भूदानाची चळवळ ही जर आपण जनतेची आणि अहिंसेची चळवळ मानत असूं तर सर्वांना पचविण्याची आपली शक्ति असली पाहिजे. समुद्र सर्व पाण्याचें आपल्या खारट पाण्यांत रूपांतर करतो. तो हिम्मतपूर्वक म्हणतो कीं कोणी हि या. माझ्या स्वरूपांत फरक पडणार नाहीं. तशी अहिंसेंत अशी हिम्मत असली पाहिजे कीं तींत जे कोणी येतील त्यांना पचवून ती आपलें च रूप देईल. मीं एकदां आगगाडीच्या रुळाचें उदाहरण देऊन म्हटलें होतें कीं आमचा रूळ जर सत्त्वगुणाचा असेल तर त्यावर चालणारे डबे आणि इंजिनें रजोगुणाचीं असोत कीं तमोगुणाचीं असोत, आपल्याला चिंता करण्याचें कारण नाहीं. रूळ मात्र योग्य दिशेनें जाणारा असला पाहिजे.

**विरोधी पक्षाला वाव द्यावा**

आज कुस्तीसाठीं कांग्रेस पक्षाला समोर मल्ल च नाहीं अशी स्थिति आहे. मी जर या पक्षाचा प्रमुख असतों तर जाहीर करून दिलें असतें कीं मला सर्व पक्षांतील चांगल्या आणि प्रामाणिक लोकांचा सहकार हवा आहे. हिंसेवर ज्यांची प्रामाणिक निष्ठा आहे, किंवा साम्यवादावर ज्यांची प्रामाणिक निष्ठा आहे त्यांना प्रामाणिक म्हणायचें. वेगवेगळ्या पक्षांतील अशा प्रामाणिक व्यक्तीं-विरुद्ध मी निवडणुकींत दुसरा मनुष्य उभा करणार नाहीं. त्या पक्षाचा विचार चुकीचा का असेना परंतु तो विचार मांडणारी व्यक्ति प्रामाणिक आणि त्या पक्षाचें प्रतिनिधित्व करणारी असेल तर त्याच्या विरुद्ध माणूस उभा करूं नये असें मी म्हणेन. मुस्लिम लीगचे प्रतिनिधि जिना होते. गांधीजी त्यांच्याबाबत म्हणत कीं या माणसांत कांहीं हि दोष असोत परंतु हा मनुष्य

विकत घेतला जाणारा नाहीं. तर अशा सच्च्या आणि प्रातिनिधिक माणसाला मी लोकसभेंत येऊं देईन. मग ते जनसंघवाले असोत, कम्युनिस्ट असोत किंवा इतर कोणी असोत. असे लोक पार्लमेंटमधें आले तर आज जी प्रतिपक्षाची उणीव दिसत आहे ती दूर होईल. हें मी कोणाला सुचविण्यासाठीं बोलत नाहीं. सूचना करण्याचा मी स्वतःचा अधिकार हि मानीत नाहीं. कारण प्रत्यक्ष कामांत पडून जो जबाबदारी उचलतो त्याला च सूचना करण्याचा अधिकार पोंचतो. म्हणून माझें हे बोलणें एक प्रकारें बेजबाबदारीचें आहे. मी हें एक प्रकट-चिंतन करीत आहें. भूदानाच्या कामांत वेगवेगळ्या पक्षांचे जे कोणी लोक येऊं इच्छीत असतील त्यांना येण्याची संधि द्यावी असें मला म्हणायचें आहे.

### त्रिविध निष्ठा

अशा रीतीनें आमच्या मंडळींत त्रिविध योग्यता असली पाहिजे. (१) अहिंसा-सत्य-अपरिग्रह यांची मूलभूत दृष्टि (२) निष्काम वृत्तीनें सेवा करण्याची शक्ति आणि सकाम लोकांना सहन करण्याची वृत्ति (३) आणि लोकनीतीवर श्रद्धा. अशी त्रिविध निष्ठा जर निर्माण झाली तर प्रारंभीं आजच्या हिंदुस्थानचें जें चित्र मीं रेखाटलें तें उरणार नाहीं. माझा असा विश्वास आहे कीं हिंदुस्थानांत अहिंसेबाबत फार आदर आहे. तामिलनाडमधें हि मला हा अनुभव आला आहे. अहिंसा त्यांच्या हृदयाची जेवढी पकड घेते तितकी दुसरी कोणती च घेत नाहीं. माझ्या बोलण्यांतील अशा च गोष्टी त्यांना बोचतात कीं ज्यांत हिंसात्मक भाव आलेला असतो. तेवढें जर मी बोललों नाहीं तर त्यांना माझें सर्वच्या सर्व बोलणें गोड वाटेल.

### अखिल भारतीय सेवकत्व धोक्यांत

आतां कांहीं व्यावहारिक गोष्टी. हिंदुस्थानांत भाषावार प्रांतरचना झाली आहे. या विचारांत दोष नाहीं, हें मीं अनेक वेळां म्हटलें आहे. चांगला विचार हि चुकीच्या मार्गानें अंमलांत येऊं शकतो ही वेगळी गोष्ट. परंतु या विचारांत अंगभूत कांहीं दोष नाहीं. भाषावार प्रांतरचनेनें एक मोठा लाभ पदरांत पडत असला तरी त्याबरोबर कांहीं दोष हि शिरण्याचा संभव आहे. त्या दोषांचें निवारण झालें पाहिजे. आज अखिल भारतीय सेवकत्व बनण्याला अनुकूलता दिसत नाहीं. इंग्रजांच्या वेळीं हिंदुस्थानांत अखिल भारतीय नेतृत्व निर्माण झालें, परंतु अखिल भारतीय सेवकत्व निर्माण झालें नाहीं. गांधीजींसारखे कांहीं थोडे पुरुष अखिल भारतीय सेवक बनले ही गोष्ट वेगळी.

### अखिल भारतीय भाषा प्रचाराला साधक

अखिल भारतीय नेतृत्व इंग्रजी भाषेमुळें बनलें. यांत आमच्या गौरवाला कमीपणा येण्याचें कारण नाहीं. गोष्ट स्पष्ट च होती कीं इंग्रजी भाषेमुळें च विवेकानंदांचें काम होऊं शकलें. विवेकानंद नसते तर तुकारामाची जी स्थिति झाली त्याहून चांगली स्थिति रामकृष्ण परमहंसांची झाली असती असें म्हणतां येत नाहीं. तुकारामाची स्थिति कमदरजाची होती असें मला म्हणायचें नाहीं. परंतु इंग्रजी भाषेमुळें रामकृष्णांची कीर्ति साऱ्या जगांत पसरूं शकली. तुकारामाचा जगावर जो उपकार झाला आहे तो कोणत्या हि प्रकारें कमी आहे असें मला वाटत नाहीं. विवेकानंद नसते तर रामकृष्णांच्या स्थितीला कांहीं उणेपणा आला असता असें हि मला वाटत नाहीं. संतांच्या विचारांचा परिणाम होण्यासाठीं प्रचारकांची अवश्यकता असते असें हि मी मानत नाहीं. परंतु हें

खरें आहे कीं विवेकानंद रामकृष्णांच्या विचाराचे मोठे प्रचारक होते, आणि इंग्रजी भाषेमुळें च ते इतका प्रचार करूं शकले. हिंदुस्थान रामानुजांना फार मोठा गुरु समजतो. परंतु तामिलनाड-मधें जे महान गुरु होऊन गेले त्यांचे रामानुज शिष्य होते. रामानुजांचें मस्तक त्यांच्यासमोर नेहमीं नम्र होत असे. ज्ञानेश्वरांसमोर तुकारामाचें मस्तक असें च नमत असे. नम्माळवार गुरूंचा रामा-नुजावर महान उपकार झाला. तो उपकार साऱ्या हिंदुस्थानांत संस्कृत भाषेमुळें च रामानुजांना पसरवितां आला. एके काळीं संस्कृत भाषेनें हिंदुस्थानांत विचार-प्रचाराचें फार मोठें काम केलें. इंग्रजी भाषेनें हि तसें च काम केलें आहे.

**हिंदीमुळें अखिल भारतीयत्व**

पण आतां भाषावार प्रांतरचना झाली आहे. त्या त्या प्रांताच्या भाषेंत आतां तेथील कारभार चालेल आणि चालला हि पाहिजे. परंतु यानें अखिल भारतीय सेवकत्व नाहींसें होण्याचा धोका आहे. तो धोका हिंदी भाषेच्या प्रचारानें दूर होऊं शकतो. आज अखिल भारतीय नेतृत्व धोक्यांत आहे. परंतु अखिल भारतीय सेवकत्व निर्माण होऊं शकतें. त्याचें उदाहरण म्हणजे आमचा हा बंग. तो कांहीं पुढारी नाहीं. परंतु अखिल भारतीय सेवक तो बनूं शकतो. ठिकठिकाणीं जाऊन तो काम करतो मंडळींशीं बोलतो. ओरिसाचा पट्टनायक हि तसा च. आज तो फार फिरत नाहीं. कारण काम करीत आहे. परंतु तो जर गुजराथ वगैरे प्रांतांत फिरून आपले अनुभव सांगूं लागला तर जो परिणाम होईल तो दुसऱ्या कोण्या पुढाऱ्याच्या सांगण्याचा होणार नाहीं. अखिल भारतीय सेवकत्वासाठीं फार मोठ्या योग्यतेची जरूर असते असें नाहीं. अखिल भारतीय नेतृत्वासाठीं योजना करायची तर तें कठिण काम आहे. परंतु अ. भा. सेवकत्व कठिण नाहीं.

दा: क्र. ११८५००

### फिरते असा

आमच्यांतील कांहीं मंडळींनीं आपापल्या प्रांतांत काम करीत असतां इतर प्रांतांत मधून मधून जात जावें. मी जास्त मागणी करीत नाहीं. सहावा हिस्सा मागतों. वर्षभरांतून दोन महिने त्यांनीं बाहेर जावें. जे बाहेर जातील ते विद्वान असले पाहिजेत असें नव्हे. पण अनुभवी मात्र हवेत. त्यांच्यांत समाजाच्या सेवेची वृत्ति असावी आणि समाजाचें निरीक्षण करतां यावें. असे लोक शंभर तरी असावेत. त्यांनीं हिंदुस्थानभर हिंडावें. भूदानाच्या कामासाठीं अशा फिरत्या माणसांची फार अवश्यकता आहे. कारण हिंदुस्थानचें शरीर जड आहे. त्याच्या एका कोपऱ्यांत एखादी घटना घडली तर दुसऱ्या कोपऱ्यांत ती पोंचत हि नाहीं. कोरापुटमधें इतकें ग्रामदान झालें पण इथें तामिलनाडमधें त्याचा कांहीं च परिणाम दिसत नाहीं. साहित्याची उणीव हें हि एक कारण आहे. ती उणीव आपण दूर करूं. परंतु वर्तमानपत्रें आणि साहित्य फक्त शहरांत च पोंचतें. खेडोपाडीं बातमी पोंचविण्यासाठीं शिबिर इत्यादींची योजना झाली पाहिजे. आणि अनुभवी लोकांनीं फिरत राहिलें पाहिजे. अशी एक व्यापक योजना आपण बनविली पाहिजे.

### प्रत्येकाच्या नांवावर जिल्हा हवा

परंतु व्यापकतेबरोबर खोली हि हवी. मी या बाबतींत दोन वर्षांपासून विचार करीत आहें. तो विचार व्यावहारिक आहे कीं नाहीं याबाबत मला शंका होती. परंतु ढेबरभाईंशीं बोलणें झालें तेव्हां मला वाटलें कीं तो विचार व्यावहारिक आहे. ढेबर-भाई म्हणाले कीं "माझ्या नांवावर एखादा जिल्हा कां देत नाहीं ?" मला असें च वाटत होतें कीं प्रत्येकाचा कोणत्या ना कोणत्या जिल्ह्याशीं संबंध असला पाहिजे. कोणत्या तरी जिल्ह्यावर आपलें

नांव असावें असें मात्र होऊं नये. तसें झालें तर इतर कार्यकर्ते शून्य बनतील, आणि हा मनुष्य अहंकारी बनेल. आणि शेंवटीं तो जिल्हा आणि तो मनुष्य दोघे हि घसरतील. म्हणून प्रत्येकाच्या नांवानें एक जिल्हा पाहिजे. ऑफिसमधें काम करणारा मनुष्य असला तरी त्याच्या नांवावर एखादा जिल्हा हवा. नाहीं तर तो एकांगी बनेल. अशा रीतीनें तीनशें जिल्ह्यांसाठीं पुरेशीं माणसें आमच्याजवळ नसलीं तर जितक्या जिल्ह्यांसाठीं असतील तितक्या जिल्ह्यांसाठीं रहावेत. दोघे चौघे मिळून एक जिल्हा पाहतात असें हि करायला हरकत नाहीं. झाडाचा ज्याप्रमाणें जमिनीशीं संबंध असतो त्याप्रमाणें आमच्यापैकीं प्रत्येकाचा एखाद्या जिल्ह्याशीं संबंध असला पाहिजे. आमचा वल्लभस्वामी इकडची बातमी तिकडे पोंचवीत फिरतो. हें व्यापाऱ्याचें काम झालें. तें हि चांगलें आहे आणि आवश्यक आहे. परंतु व्यापाराबरोबर त्यानें हि कांहीं उत्पादन केलें पाहिजे. आज तो सल्ला देतो. परंतु अनुभवाशिवायचा तो सल्ला असतो. त्याच्या हातून काम झालेलें असेल तर तो अनुभवाच्या कसोटीवर कसलेल्या गोष्टी सांगेल. कुराणांत अनेक ठिकाणीं महम्मदानें म्हटलें आहे कीं ‘मी कवि नाहीं. कवि स्फूर्तीच्या जोरावर बोलतो. मी स्फूर्तीच्या जोरावर बोलत नाहीं, प्रत्यक्ष अनुभवाच्या जोरावर बोलतों.’ अशा रीतीनें प्रत्यक्ष अनुभव असला म्हणजे आपल्या कामांत तेज येतें.

खरें म्हणजे असें व्हायला पाहिजे कीं सगळें काम जनतेवर सोंपवून दिलें आहे आणि तो मनुष्य केवळ शून्य बनून काम करीत आहे. आपण एखाद्याला नेमलें तर तो शून्य नाहीं बनणार. तो किती हि मोठा आंकडा बनला तरी शून्याहून कमी च ठरणार. कारण शून्याच्या मागे दुसरे सगळे आंकडे राहूं शकतात. या

माणसानें दुसऱ्याकडून काम करवून घ्यावे. हा तगादा लावणारा असावा. हा तगादा शब्द मोठा मजेदार आहे. सगळ्यांच्या मागें लागून त्यानें काम करून घ्यावें. ही आमची निर्मला आहे. आमच्याबरोबर हिंडते. तिचा आम्हांला पुष्कळ उपयोग होतो. परंतु तिच्या नांवावर एखादा जिल्हा पाहिजे. तसें झालें म्हणजे तिनें जें काय एवढें ऐकलें त्यापैकीं किती पचविलें आणि किती नुसतें सांठवून ठेवलें तें कळेल. अप्पा पटवर्धनांचें नांव रत्नागिरी जिल्ह्याशीं जोडलेलें आहे. वैद्यनाथ बाबूंचें नांव पूर्णिया जिल्ह्याशीं जोडलेलें आहे. अशा रीतीनें प्रत्येकाचें नांव एकेका जिल्ह्याशीं जोडलेलें पाहिजे.

**अवैतनिक असंख्य कार्यकर्ते आहेत**

पुष्कळांना वाटतें कीं पगारी लोकांमार्फंत च भूदानाचें काम होत आहे. मला हि असें वाटत होतें. परंतु मीं तामिलनाडमधली स्थिति पाहिली तेव्हां कळलें कीं लोकांना वाटतें तसें नाहीं. येथें शेंकडो लोक काम करीत आहेत. परंतु फक्त ५५ लोकांना वेतन मिळतें. त्यांतून ४–५ ऑफिसमधले असतील. म्हणजे फिरणाऱ्यामधें पन्नासएक लोकांना पगार मिळतो. परंतु पांचशेच्या वर माणसें तामिलनाडमधें काम करीत आहेत. पूर्ण वेळ ते देत नसतील तरी पुष्कळ वेळ देत आहेत.

**निधिमुक्ति आवश्यक**

जे पगारी लोक ठिकठिकाणीं पूर्ण वेळ काम करीत असतील त्यांना आपल्याला गमवायचें तर नाहीं च. परंतु त्यासाठीं अशी कांहीं व्यवस्था झाली पाहिजे कीं ते आपापल्या ठिकाणीं स्थानिक आधारावर उभे राहतील. मला वाटतें अशी योजना करण्याची शक्ति आमच्यांत कमी नाहीं. परंतु तिचा आम्हीं उपयोग केला

नाहीं. संपत्तिदान देणारे अनेक लोक विचारतात कीं आमच्या दान दिलेल्या संपत्तीचा काय उपयोग करावा ? त्यांना सांगतां येईल कीं तुमच्या भागांत अमुक अमुक कार्यकर्ता आहे त्याला तुमची रकम पाठवीत जा. असें झालें तर काम सुटसुटीत होईल. म्हणून लवकरांत लवकर तो वरचा गांधी-निधीचा आधार सोडला पाहिजे.

भूदान-कार्यकर्त्यांची एक सेना बनली पाहिजे असें मी नेहमीं म्हणतों. सेना बनण्यालायक मसाला आपल्यापाशीं तयार आहे. कित्येक दात्यांनीं आम्हांला दान दिलें आहे. कांहीं श्रमदान मिळालें आहे. कांहीं संपत्तिदान मिळालें आहे. कांहीं साधनदान मिळालें आहे. त्या च प्रमाणें कांहीं लोकांनीं आमचें दान स्वीकारलें हि आहे. घेणारांनीं त्या दानाचा चांगला विनियोग केला असेल तर ते हि देशसेवक होतील. ज्यांनीं दान दिलें त्यांच्यांतून विचाराचा प्रचार करणारे हि कांहीं लोक मिळतील. अशा रीतीनें दाते, आणि दान घेणारे ( आदाते ) यांची सेना बनूं शकते. याचा कांहीं थोडा आरंभ आम्हीं इथें केला आहे. हैद्राबाद राज्यांत दातासंघ बनविण्यांत आला. ज्यांनीं जमिनी दिल्या ते जमीन मागण्याचें काम करूं लागले. असे अनेक दाते काम करीत आहेत.

**तामिलनाडमधील मुक्काम**

आतां थोडें व्यक्तिगत. तामिलनाडला मी पुरा न्याय करूं इच्छितों. म्हणून ते ठेवूं इच्छितील तितके दिवस राहण्यास मी तयार आहें. बाबाचा उपयोग आपण करायचा आहे असें त्यांनीं मानलें पाहिजे. बाबा त्यांचा उपयोग करून घेत आहे असें असतां कामा नये. नुकते च कामराज नादर मला भेटून गेले. मीं त्यांना म्हटलें कीं तामिलनाडमधला सर्वांत कठिण जिल्हा तंजावर

मानला जातो. तसा तो उगीच च कठिण मानला गेला आहे. कठिण अशासाठीं मानला जातो कीं तिथें सिंचाईची (इरिगेशनची) जमीन बरी च आहे, जमिनीच्या किंमती जास्त आहेत. म्हणून जमिनीची आसक्ति तिथें जास्त आहे. परंतु कठिण या साठीं नाहीं कीं तामिलनाडची सर्वोत्तम संस्कृति आणि सर्वोत्तम साहित्य कावेरीच्या किनाऱ्यावर तंजोर जिल्हयांत च प्रकट झालें आहे. म्हणून मीं कामराजना म्हटलें कीं ह्या जिल्ह्याची जबाबदारी तुम्हीं घेतली पाहिजे. त्यांनीं उत्तर दिलें कीं "ठीक आहे ती जबाबदारी माझी" अशा रीतीनें कोणी जर बोललें तर माझ्यावर त्याचा खोल परिणाम होतो. जनतेशीं ज्याचा निकट संबंध असेल तो च असें हिंमतपूर्वक बोलेल. मला उमेद आहे कीं कामराजजी तें काम पुरें करूं शकतील. अशा रीतीनें दुसरी हि कांहीं मंडळी बोललीं आहेत. म्हणून मीं त्यांना निर्भय केलें आहे कीं जरी मीं एक तारीख ठरविली आणि १२ मार्च नंतर तामिलनाड सोडण्याचें ठरविलें आहे तरी जर तुम्ही मंडळी येथें विशेष परीस्थिति निर्माण करून दाखवाल आणि मला येथें ठेवून घेऊं पहाल तर मी रहायला तयार आहें. इथें पाणी न मिळालें तरी तसें च परत जायचें असें मीं ठरविलेलें नाहीं. मी तर येथून समुद्राच्या पाण्यानें भरलेला घडा बरोबर घेऊन जाऊं इच्छितों.

### यापुढें मुक्त-विहार

परंतु येथून जर मोकळा झालों तर पुढें माझी वृत्ति मुक्त-विहार करण्याची आहे. शिबिर असेल तिथें जावें, चर्चा करावी आणि फिरत रहावें असें मनांत आहे. आज चालू आहे त्या कार्य-क्रमानें मला कांहीं त्रास होतो अशांतला भाग नाहीं. परंतु मुक्त-विहारानें माझें काम चांगलें होईल असें मला वाटतें. विशेषत:

महाराष्ट्र आणि गुजराथमधें जेव्हां मी जाईन तेव्हां भूदान इत्यादींचें कवच खालीं काढून ठेवून एखादा बालक ज्याप्रमाणें नग्न अवस्थेंत आपल्या आईजवळ जातो तसें नग्नरूप होऊन जावें असें मनांत आहे. तिथें लोकांना खास कांहीं ऐकविण्यासाठीं जायचें नाहीं, केवळ सेवा करण्यासाठीं जायचें. तामिलनाडवाल्यांनीं जर परिपूर्ण समुद्र-कलशासहित मला येथून रवाना केलें तर यापुढें व्यक्तिगत पुण्य संपादन करण्याची माझी वृत्ति नाहीं. आज जें हें पुण्य संपादन केलें आहे तें हि व्यक्तिगत नसून सार्वजनिक च आहे हें खरें, तथापि त्यांत व्यक्तिगत स्वरूप थोडें येतें च. तें व्यक्तिगत स्वरूप सुटून केवळ......! बस त्या संस्कृत 'केवल' शब्दांत च पुष्कळ भरलें आहे. केवल होऊन रहावें असें मी इच्छितों. गुजराथची आणि महाराष्ट्राची मंडळी यांतील रहस्य ओळखतील अशी मला उमेद आहे. केवळ अकर्तृ-स्वरूप होऊन जायचें मनांत आहे. गुजराथकडून मला पुष्कळ मिळालें आहे. संस्कृत सोडल्यास मराठींतलें जेवढें साहित्य मीं वाचलें आहे तितकें दुसरें कोणतें च वाचलें नाहीं. जगाच्या कित्येक भाषांचें थोडें बहुत ज्ञान मला असलें तरी मी आजारी पडून वातांत बडबडूं लागलों तर मराठी किंवा संस्कृत वचनांशिवाय माझ्या मुखांतून दुसरें वचन सहजपणें निघणार नाहीं. कारण ती भाषा थेट आंत भिनलेली आहे. त्या भाषेंतील वचनांत विशेष शक्ति भरली आहे असें नव्हे. एकदां एक ख्रिस्ती सज्जन मला भेटले. त्यांनीं विचारलें कीं बाइबलमधें तुम्हांला काय नवीन वाटलें? मीं त्यांना ज्या गोष्टी सांगितल्या त्या ऐकून त्यांना आश्चर्य वाटलें. 'न्यू टेस्टॅमेंट' आणि 'फोर गॉस्पेल्स' मधील अशा कितीक गोष्टी आहेत कीं त्यांवर मी व्याख्यान द्यायला बसलों तर जें हिंदुधर्मांत कमी दिसतें किंवा

इस्लाम धर्मांत कमी दिसतें तें त्यांत आहे हें दाखवून देईन. तथापि या सर्व भाषांचा अभ्यास केला नसता तरी माझ्या आध्यात्मिक घडणींत त्यामुळें फरक पडला असता असें मला वाटत नाहीं असें हि मीं त्याला सांगितलें. बालपणीं संस्कृत आणि मराठीचीं वचनें मीं ऐकलीं आणि नंतर गुजराथीमधून जें ऐकलें तें च भरपूर आहे. इतर धर्माचीं जीं वचनें नंतर मीं वाचलीं त्यांनीं माझी भावना परिपुष्ट झाली. हा त्या भाषांचा मी मोठा उपकार मानतों. म्हणून महाराष्ट्रांत मी जाईन तेव्हां मनांत एखादा खास विचार, उपाधि, कार्य, किंवा कार्यक्रम घेऊन जायचा माझा मानस नाहीं.

**आजारपण ही सत्त्वगुणांतली उणीव**

शेंवटीं माझ्या आजारपणाबद्दल. मी आजारी पडलों याबद्दल मला लाज वाटते. तें आजारपण टळलें असतें असें मला वाटतें. माणसाच्या हातून त्याला न कळत चूक होऊन जाते. तशी चूक माझ्या लक्षांत हि आली आहे.

गीतेंतील सत्त्वगुणाच्या लक्षणावर टिप्पणीं देतांना गीताई-कोषांत मीं लिहिलें आहे कीं सत्त्वगुण "प्रकाशकम् अनामयम्" असतो. म्हणजे तो ज्ञानरूप असतो आणि आमयरहित म्हणजे आरोग्यदायी असतो. सत्त्वगुणी नीतिमान्, बुद्धिमान, चारित्र्यवान, असतो असें आपल्याकडे मानलें जातें. परंतु सत्त्वगुणी निश्चितपणें तीव्र बुद्धीचा असला च पाहिजे असें मानलें गेलें नाहीं. परंतु गीतेच्या भाषेचा अर्थ असा आहे कीं जो सत्त्वगुणी असतो तो च बुद्धिमान असूं शकतो.

सत्त्वगुणी मनुष्य आजारी पडूं शकत नाहीं असें तर मानलें च गेलें नाहीं. आजारपण आलें तर कुठें तरी रजोगुण किंवा तमोगुण आला असें मानलें जात नाहीं. प्रकृतिधर्म आहे. त्यामुळें

मनुष्य आजारी पडणें न पडणें ईश्वराच्या हातांत आहे असें मानलें जातें. परंतु त्या गीतावचनाचा मी असा अर्थ करतों कीं सत्त्वगुणांत ज्या प्रमाणें नीति आणि चारित्र्य येतें त्या प्रमाणें च कुशाग्र बुद्धि आणि संपूर्ण आरोग्य सत्त्वगुणांत असलें च पाहिजे अन्यथा तो गुण कांहीं मात्रेमधें कमी आहे असें मानलें पाहिजे. अनुभव देखील तसा च येतो. जेव्हांपासून या बद्दलचें भान मला आलें आहे तेव्हां-पासून चुकीशिवाय आजारी पडल्याचें मला स्मरत नाहीं.

---

: २ :

# *अहिंसक क्रांतीची प्रेरणा

**एकाग्रता-परिणामः**

अलीकडे माझ्यामधें आत्यंतिक एकाग्रता आलेली आहे. जें काम घेतलें तें एकाग्रतेनें च करण्याची माझी संवय आहे. तथापि या वेळीं विशेष प्रकारचा मानसिक अनुभव आला. या ३ ता. ला सकाळीं यात्रेला निघाल्यावर मला ग्लानि आली आणि मी थांबून गेलों. आज यात्रा करतां येणार नाहीं असें आंतून भासत होतें. परंतु प्रत्यक्ष अनुभवाशिवाय निर्णय करणें बरें नाहीं असें वाटून मी निघालों. यांत अेक प्रकारचा अविवेक आहे असें हि म्हणतां येईल. परंतु हा एकाग्रतेचा परिणाम आहे.

पतंजलीचें एक सूत्र आहे — "शांतोदितौ तुल्य-प्रत्ययौ एकाग्रता-परिणामः" पहिल्या क्षणांत जी भावना उत्पन्न झाली आणि शांत झाली, ती च दुसऱ्या क्षणीं पुनः उत्पन्न झाली असें

[*स. से. संघाच्या बैठकींतील दुसरें भाषण पळणी ता. २१-११-५६]

झालें म्हणजे त्या दोन्ही भावना तुल्य होतात. याला एकाग्रतेचा परिपाक म्हणतात. 'एक च भावना सतत मनामधें राहत आहे' अशी भाषा पतंजलि वापरीत नाहीं. एक च भावना सतत मनांत राहणें याचें नांव एकाग्रता. परंतु एक च भावना प्रतिक्षण मनांत उठते आणि प्रतिक्षण लीन होते अशी जी प्रतिक्षण उठण्याची आणि लीन होण्याची क्रिया तिला एकाग्रता-परिणाम—एकाग्रतेचा परिपाक—असें पतंजलि म्हणतो.

या वस्तूचा अनुभव या तीन चार दिवसांत मला आला. इथें अनेक प्रकारच्या चर्चा झाल्या. परंतु त्या सर्व वर वर झाल्या आणि गेल्या. मनांतून सत्तावनच्या क्रांतीच्या कल्पनेचा च जप चालू आहे असा मला अनुभव येत होता.

**विरोधात्मक दृश्य**

जगांत एक विचित्र दृश्य आज दिसत आहे. हंगेरी आणि पोलंडमधें झालेल्या घटनांत असें दिसून येतें कीं रशिया जबरदस्ती करीत आहे. परंतु त्या च वेळीं असें हि आपण ऐकतों कीं निःशस्त्रीकरणाला, हायड्रोजन–अॅटम–बाँबचे प्रयोग बंद करण्याला आणि परस्परांच्या देशांतील अमुक एका हद्दीपर्यंतचें निरीक्षण करण्याला संमति देण्यास आतां रशिया तयार झाला आहे.

**अनिश्चयाची स्थिति**

हें सगळें ढोंग च आहे असें म्हणतां येत नाहीं. ज्यांच्या शिरावर राष्ट्राची जबाबदारी आहे अशा मोठ-मोठ्या पुढाऱ्यांचीं मनें आज अतिशय बेचैन आहेत. अनेक समस्या समोर उभ्या आहेत. परस्पर विरोधी मागण्या पुढें येत आहेत. यांतून मार्ग दिसत नाहीं. एका बाजूनें सैन्यबलावरील श्रद्धा सोडूं शकत नाहींत

तर दुसऱ्या बाजूनें त्या बलावर पुरी श्रद्धा राखूं शकत नाहींत अशी त्यांची दशा झाली आहे.

मनुष्याच्या मनांत कांहीं एक श्रद्धा स्थिर असावी लागते. भावना विपरीत असली तर परिणाम विपरीत येईल. परंतु निदान कर्मयोग तरी हातून होईल. कर्मयोगाला मनाचा निश्चय असावा लागतो. परंतु आजच्या पुढाऱ्यांच्या मनांत निश्चय च दिसत नाहीं. त्यांचीं मनें शंकाकुल आहेत. अशा स्थितींत ज्यांचीं मनें निःसंशय असतील आणि जे आपलीं डोकीं शांत आणि सुनिश्चित ठेवणारे असतील त्यांच्या च कडे जगाचें नेतृत्व येईल, त्यांची इच्छा नसून येईल. परिस्थिति तर अशी दिसते कीं केव्हां जागतिक युद्ध पेटेल तें सांगतां येत नाहीं. परंतु एकूण सगळ्या शक्ति अहिंसेच्या च दिशेनें काम करीत आहेत असें मी मानतों. संभव असा हि आहे कीं अहिंसेला वाव देण्यापूर्वीं कचकचीत रक्त-क्रांति देखील होईल.

**मरुत्‌गण**

'आजची निवडणुकीची पद्धति चुकीची आहे, पक्षीय राजकारणांत दोष आहेत, लोकशाहीमधें सुधारणा व्हायला हवी;' वगैरे गोष्टी आम्ही गेल्या चार पांच वर्षांपासून बोलत आलों. परंतु हे च विचार आज काँग्रेसमधील नेते बोलून दाखवूं लागले आहेत. हें सर्व कोण करवीत आहे ? आम्ही जें बोललों त्याचा हा परिणाम झाला असें आम्हीं म्हणूं शकत नाहीं. म्हणणें चूक च होईल. जगांत एक अव्यक्त शक्ति विचाराला चालना देऊन राहिली आहे आणि तीमुळें च लोकांचीं मनें समान दिशेनें विचार करूं लागलीं आहेत असें म्हणावें लागतें. वेदांत मरुत्‌गणांचा उल्लेख येतो. वायु वेगळा मरुत्‌गण वेगळे. वायु स्थूल वस्तु आहे. मरुत्‌गण

चिंतनयुक्त असतात. चिंतनाचा एक प्रवाह वाहत असतो. एका च काळीं भिन्न देशांतील लोकांना एका च प्रकारचे विचार सुचतात. हा त्या मरुत्‌गणांचा परिणाम असतो.

१९५७ सालचा मीं उच्चार केला. परंतु यांत हि अनेकांच्या इच्छाशक्ति एकवटल्या आहेत असें मला वाटतें. ज्यांच्या विचारांत बरा च भेद होता अशांच्या हि विचारांचें संमेलन होत आहे. ते एकमेकांच्या जवळ येत आहेत. हिन्दुस्थानांतील कम्युनिस्ट लोक घ्या. त्यांचा जुना इतिहास आहे. त्यांची एक विशिष्ट कार्य-पद्धति आहे. अनेक लोक त्यांच्याकडे संशयाच्या नजरेनें पाहतात. परंतु ते संशयाला पात्र नसून दयेला पात्र आहेत. ते लोक हि निश्चितपणें अहिंसेकडे येत आहेत. एकूण अशी एक परिस्थिति सगळ्या जगांत येत चालली आहे कीं जगांतील लोक अहिंसेकडे अधिकाधिक खेचले जात आहेत.

जी शक्ति भूदानाला प्रेरणा देत आहे ती च शक्ति कम्यु-निस्टांच्या विचारांत बदल घडवून आणीत आहे. भूदानाचा विचार अजून आम्ही इतका मजबूत बनवून दाखवूं शकलों नाहीं कीं ज्यामुळें कम्युनिस्टांना पाहिजे असलेलें उत्तर मिळावें. तसें पाहिलें तर आम्हीं विशेष काय केलें आहे ? खेडोपाडीं फिरत आहोंत आणि लोकांना समजावून सांगत आहोंत या पलीकडे काय केलें ? परंतु विमलाताई म्हणाल्या त्याप्रमाणें आपण या पांच सहा वर्षांत कुठल्या कुठें निघून गेलों आहोंत ! भूदानाच्या फलश्रुतीचें माप जमीन किती एकर मिळाली यावरून काढणें चूक होईल. विचारांत किती बदल झाला हें पाहिलें पाहिजे. विचार बदलला कीं सारी जमीन एका दिवसांत हि वाटून होईल. परंतु विचाराच्या दृष्टीनें आपण जे इतके पुढें गेलों ते हि अगाऊ ठरवून नाहीं गेलों.

मला स्वतःला च कल्पना नव्हती कीं भूदानांतून ग्रामदानाची कल्पना निघेल आणि त्यांतून ग्रामराज्यापर्यंत पोंचून आपण स्वतंत्र जनशक्तीची गोष्ट बोलूं लागूं. "शासनमुक्त समाज" हा शब्द हि उशीरा निघाला. मला वाटतें या दोन तीन वर्षांत च ही कल्पना पुढें आली.

**परमेश्वर शरणता**

अशा रीतीनें एक योजना जगांत काम करीत आहे आणि तींत आपण सगळे निमित्त बनून वागत आहोंत. या कल्पनेंत परवशता आहे असा कोणी आक्षेप घेईल. हा आक्षेप मी कबूल करतों. ह्या आक्षेपांत त्या कल्पनेचा गौरव च आहे असें मला वाटतें. ही परवशता आहे परंतु ती परमेश्वर-परवशता आहे. आपण केवळ त्या परमेश्वराच्या हातांतील निमित्तमात्र साधन आहोंत अशी जेव्हां अनुभूति येते तेव्हां च खरें काम होतें. आम्हीं आमच्या बुद्धीनें च कांहीं केलें असें म्हणणें न्यायाला धरून होणार नाहीं. बुद्धीचा उपयोग जरूर करावा. परंतु जिथें बुद्धीची परिसमाप्ति होते अशा पातळीवरून अहिंसेच्या दिशेनें जगांतील शक्ति काम करीत आहे ससें मला म्हणायचें आहे.

निवडणुकीच्या पद्धतीवर मीं टीका केली त्यांत माझी स्वतंत्र कल्पना होती असें नव्हे. गांधीजींनीं हि अशा सारखे कांहीं विचार पूर्वीं प्रकट केले होते. गयेला मी पंडितजींशीं बोलतांना ते विचार प्रथम प्रकट केले. परंतु त्यावेळीं अचानक च मला ते सुचले. अगाऊ ठरवून मीं त्यांच्याशीं बोललों असें नव्हतें. त्यावेळीं पंडितजींकडून निश्चित उत्तराची अपेक्षा हि करतां येण्यासारखी नव्हती. परंतु यावेळीं पंडितजी पुनः भेटले तेव्हां त्यांचें मानस या दृष्टीनें तयार झालेलें मला दिसलें. त्या च प्रमाणें एस्. आर्. सी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.


(राज्य पुनर्रचना मंडळ) च्या प्रकरणांत हि अशा कांहीं घटना घडल्या कीं ज्यामुळें अहिंसेची योजना काम करून राहिली आहे असा भास होतो.

### अज्ञात शक्ति काम करीत आहे

लोक विचारतात १९५७ मधें काय विशेष होणार आहे? आम्ही स्वतःच्या शक्तीनें काम करीत असतों तर हा प्रश्न योग्य होता. आणि आमच्या च शक्तीनें काम करायचें म्हटलें तर ५७ सालपर्यंत तर सोडून च द्या परंतु १०० वर्षांत हि हें काम होण्याची आशा नाहीं. कारण हें काम हृदयपरिवर्तनाचें आहे. कायद्याचें किंवा रक्तरंजित क्रांतीचें काम असतें तर गोष्ट वेगळी होती. परंतु स्वामित्व-विसर्जनाचें काम आमच्या शक्तीनें थोडें च व्हायचें आहे!! असें असून आम्ही म्हणतों कीं हें काम होणार आहे. तें कशाच्या जोरावर? जगाच्या सर्व शक्ति आम्हांला त्या दिशेनें घेऊन जात आहेत.

### क्रांतीच्या पूर्व प्रयोगाला तयार रहा

मीं या कामांत बुद्धीचा उपयोग केला नाहीं. तुम्ही हि करूं नका. १९५७ सालीं जगामधें क्रांति होणार आहे त्यासाठीं आपल्या मनाचीं दारें सताड उघडीं ठेवा. त्या क्रांतींत स्वतःचें समर्पण करण्याची तयारी ठेवा. असें होऊं नये कीं क्रांतीची संधि येऊन गेली आणि आम्ही गाफिल राहिलों. मी विनोदानें याला नाटक म्हणतों. नाटक म्हणजे मिथ्या वस्तु असें नव्हे. इंग्रजींत ज्याला रिहर्सल (पूर्व प्रयोग) म्हणतात तसें हें आहे.

आतां अण्णांनीं निधीचा उल्लेख केला. मला आतां या गोष्टी ऐकण्यांत हि गोडी उरली नाहीं. १९५७ मधें जें काम आपल्याला करायचें आहे तें हळू हळू करूं असें जें येथें सांगण्यांत

आलें त्यांत सार नाहीं. तो दुबळेपणा च आहे. दोरी एकदम च कापावी लागते. आज भूदानाचें काम वैतनिक कार्यकर्ते असल्यामुळें होत आहे हा भ्रम अनेकांच्या मनांत आहे. हिंदुस्थानांत बेकारी फार आहे. म्हणून कांहीं थोडया लोकांना वैतनिक काम मिळाल्या-बरोबर लोकांचें लक्ष तिकडे वेधलें जातें. आम्हांला हि असा भास झाला आहे कीं वैतनिक कार्यकर्त्यांच्या जोरावर च भूदान चाललें आहे. हा भ्रम मनांतून काढून टाका. जाहीर करून टाका कीं "१९५७ साल जवळ आलें आहे. ३१ डिसेंबरला सर्व वेतन वगैरे बंद. बजेट नाहीं नि मंजुरी नाहीं. हें असें केल्यानें सगळीकडचें काम बंद पडेल अशी मंडळींना शंका वाटते. परंतु त्यांत कांहीं बिघडणार नाहीं. यानंतर एकमेकांना संभाळून घ्यायचें, जें आहे तें वाटून खायचें असें ठरवून निर्णय करा. आपल्याला कोणाचा त्याग करायचा नाहीं. धनच्छेदाच्या निर्णयानें काय परिणाम होतो हें पहायचें असेल तर कल्पना करा कीं येथें सभेला आलेल्या मंडळींनीं ठरविलें कीं पैशाचा उपयोग करायचा नाहीं. त्यामुळें जर येथून परत जातांना आम्ही पायीं जाणार आहोंत तर एका क्षणांत क्रांतीचें दर्शन होईल. लोक हि म्हणतील कीं हे कसे पागल लोक आहेत. पण असा पागलपणा च क्रांतीसाठीं लागतो. आज च पैशाचा त्याग करा असें मला सुचवायचें नाहीं. परंतु ३१ डिसेंबर नंतर पैसा घेणार नाहीं असें ठरवा. विजेचा संचार झाल्याप्रमाणें त्याचा हिन्दुस्थानभर परिणाम दिसेल.

**संघात नको, चेतना हवी**

अशी च क्रांतीची दुसरी वस्तु करायला हवी. प्रत्येक जिल्ह्याशीं कोण्या-ना-कोण्या व्यक्तीचा संबंध असायला हवा. हिंदुस्थानांत तीनशे जिल्हे आहेत. त्यासाठीं तीनशे व्यक्ति हव्या. सर्व सेवा

संघातर्फे जें प्रकाशक-मंदिर चालेल तें या लोकांना प्रेरणा देत राहील. प्रत्येक जिल्ह्याशीं चेतनाचा संबंध मी जोडूं इच्छितों. समिति बनली कीं त्या ठिकाणीं संघात वाढतो. एक व्यक्ति असली कीं चेतना काम करते. ती व्यक्ति एकटी असल्यामुळें स्वतः शून्य बनून इतर सर्वांचा सहकार घेईल. या योजनेंत धोका हि आहे. या व्यक्ति कमी अधिक शक्तीच्या असतील. कांहीं ठिकाणीं अयोग्य व्यक्ति असल्या तर तिथें चुकीच्या पद्धतीचें काम होईल, असा सर्व धोका यांत आहे. परंतु एवढया मोठ्या आंदोलनांत धोके असायचे च, ते खपून हि जातील. त्यानें नुकसान होणार नाहीं. अनुभव वाढेल. क्रांतीच्या तयारीची ही योजना आहे.

**सामूहिक संकल्पासाठीं संमेलन**

तुम्हीं मंडळींनीं संमेलन करण्याचें ठरविलें तें ठीक च आहे. भूदानाच्या चळवळीला आतां साडे पांच वर्षांनंतर हिंदुस्थानांतील सर्व राजकीय पक्षांची सहानुभूति लाभलेली आहे. हवेंत १९५७ च्या क्रांतीची गोष्ट पसरली आहे. ५७ चा संकल्प माझा व्यक्तिगत असल्याचें मीं कधीं च मानलें नाहीं आणि लोकांनीं हि तसें मानलें नाहीं. काँग्रेस देखील म्हणते कीं पांच कोट एकरांचा संकल्प पुरा झाला पाहिजे. त्यामुळें नवीन वर्षांतील निवडणुकांचें काम आटोपलें कीं सगळे वेगानें कामाला लागतील अशी मला आशा आहे. आम्ही त्या वेळीं वित्तच्छेद केलेला असणार आणि भूदान समित्या बंद करून दर जिल्ह्याशीं एकेकाचा संबंध जोडून दिला असणार. त्यामुळें निवडणुकीनंतर देशापुढें या संकल्पाचें कसें होणार ही एक मोठी समस्या उभी राहणार आहे. ज्या संकल्पाचा उच्चार साऱ्या देशानें केला अशा एका मोठ्या संकल्पाला आपण पराजित होऊं द्यावें का, ही ती समस्या आहे. आपण हात जोडून बसून रहायचें

आणि या लोकांची फजिती झालेली पहायची का ? यांत देशाची तरी काय लाज राहणार आहे ? सरकारची किंवा इतर राजकीय पक्षांची तरी काय लाज राहणार आहे ? जमिनीच्या वाटपाचें काम आम्ही करणार म्हणजे कोण ? आम्ही भारतमातेची संतान आहोंत तसे तुम्ही हि आहांत. आमची फजिती झाली तर जगांत आमच्या सरकारचा झेंडा थोडा च ऊंच होणार आहे ? काँग्रेसचा त्यांत काय जयजयकार आहे ? भूदानाचें काम खंडित झालें तर साऱ्या देशाची प्रतिष्ठा खंडित होणार आहे असा विचार करून सर्व लोक या कामाला हातभार लावायला धावून येतील.

म्हणून या वेळचें संमेलन हा असा प्रसंग आहे कीं त्या वेळीं सर्वांच्या मुखानें एक मोठा संकल्प होईल आणि सगळे जोरांत कामाला लागतील. असें झाल्यावर २-४ महिन्यांत हि काम पुरें होऊं शकतें. दिवाळी एका दिवसांत देशभर साजरी होते असें मी नेहमीं उदाहरण देत असतों. मला आणखी एक उदाहरण मिळालें आहे. पं. नेहरू म्हणतात कीं "सार्वत्रिक निवडणुका दीर्घकाळपर्यंत चालत राहिल्या तर शक्तीचा क्षय होतो आणि द्वेष वाढतो. म्हणून या वेळीं १५ दिवसांत देशभरांतील सर्व निवडणुका संपवायच्या आहेत. पुढच्या वेळीं तर सात दिवसांत च आटोपण्याची इच्छा आहे." तयारी च केली तर पुढें एका दिवसांत देखील निवडणुका संपवितां येतील. आणि मला यांत मुळीं च शंका वाटत नाहीं कीं व्यवस्था केली तर जरूर एक दिवसांत निवडणुका संपूं शकतात. पंडितजींचें हें म्हणणें ऐकल्यावर मला विशेष च उत्साह आला आहे. एका दिवसांत जर सार्वत्रिक निवडणुका होऊं शकतात तर जमिनीचें वाटप एका दिवसांत होऊं न शकायला कांहीं च कारण नाहीं. देशाची इच्छाशक्ति जागृत झाली तर हें काम जरूर कांहीं

महिन्यांत पुरें होऊं शकेल. १९५७ सालीं पांच कोट एकर जमीन वाटली जाईल किंवा भूमिक्रांति सफल होईल इतकें च नव्हे तर साऱ्या जगांत शांतीची स्थापना होऊं शकते. आपल्या धर्मग्रंथांत म्हटलें आहे कीं "यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत, अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्" धर्माची ग्लानि होते तेव्हां भगवान अवतार घेतात. यांत दैववाद नाहीं. भगवंताचा अवतार होणार आहे या भावनेनें जेव्हां सर्वांचीं मनें तयार होतात तेव्हां अवतार होऊन च चुकलेला असतो. अवताराचें असें हें रहस्य आहे. आपलीं सर्वांचीं मनें हि ५७ च्या क्रांतीसाठीं तयार झालीं कीं क्रांति होऊन चुकली आहे असें दिसून येईल.

---

: ३ :

# क्रांतीची प्रक्रिया

गांधीजी गेल्यानंतर गांधी-विचारावर श्रद्धा असणारे देशभरांतील सेवक सेवाग्रामला जमले होते. त्यांनीं बऱ्या च विचार-मंथनानंतर सर्वोदय-समाजाच्या स्थापनेचा संकल्प केला. तो एक वैचारिक आणि वैप्लविक संकल्प होता. त्यांत विचार-परिवर्तन, हृदय-परिवर्तन आणि जीवन-परिवर्तन अशी त्रिविध प्रक्रिया अंतर्भूत होती. अशा संकल्पाला क्रतु म्हणतात, "सर्वोदय-क्रतू" चा जन्म अशा प्रकारें १९४८ च्या मार्चमधें सेवाग्रामला झाला.

क्रतूमधून यज्ञाची निष्पत्ति व्हायची च. "अहं क्रतुः अहं यज्ञः" हें गीता-वचन सर्वांच्या परिचयाचें आहे. तदनुसार अकल्पित आणि

अभावित रीत्या शिवरामपल्लीच्या सर्वोदय-संमेलनानंतर भूदान-यज्ञाचा प्रादुर्भाव तेलंगणांत झाला. गेल्या पांच वर्षांत या यज्ञाची एकेक कला प्रकट होत गेली. सारे सर्वोदय-सेवक जणूं तमांतून ज्योतीमधें आले. गांवोगांवच्या लोकशक्तीचें जें दर्शन या पांच वर्षांत झालें तें अद्‌भुत होतें. या नवज्योतीचा प्रभाव सर्वोदय कार्यक्रमाच्या प्रत्येक शाखेवर पडला आणि सर्वत्र चेतनेचा संचार झाला.

बहुधा लोकशक्तीचा नवा आविष्कार जुन्या संचिताच्या आधारावर च होत असतो. गांधीजींच्या स्मृतिप्रीत्यर्थ देशांतील पुढाऱ्यांनीं दूरदृष्टीनें एक निधि गोळा केला होता. आज हि तो शिल्लक आहे आणि आपल्या सकुशल क्षयाची वाट पाहत आहे. या निधींतून भूदानाच्या चळवळीला जी सहज मदत मिळूं शकली ती घेण्यांत आली. आणि तशी ती घेणें योग्य हि होतें. परंतु नवचेतनेच्या प्रथम आविष्कारांतलें मदतरूप संचित प्राथमिक विकासानंतर हि जर पुढें चालू राहिलें तर पुढील प्रगति खुंटविण्यास कारणीभूत होऊं शकतें. मीं वर म्हटल्याप्रमाणें गांधी-निधि गोळा करण्यांत दूर-दृष्टि असली तरी सुदूर-दृष्टि नव्हती. सीमित दृष्टि कधीं कधीं सुदूर-दृष्टीचा छेद करते. निधि अजून हि आहे. त्याची मदत आज मिळत आहे, आणि जोंपर्यंत तो शिल्लक आहे तोंपर्यंत ती मदत पुढें हि मिळूं शकेल.

परंतु वर्ष दीड वर्षापासून माझ्या मनांत येत होतें कीं हा आधार तोडल्याशिवाय वैश्वानर अग्नि प्रकट होऊं शकणार नाहीं. होमाग्नि प्रकट होऊं शकतो आणि तसा तो झाला हि. परंतु होमाग्नि जोंपर्यंत कुंडांत सीमित राहील तोंपर्यंत वैश्वानर अग्नीची आशा करतां येत नाहीं. म्हणून कुंडच्छेद करावा च लागतो.

माझे सर्व सहकारी या विषयावर विचार करीत होते. कांहीं किंतु त्यांच्या मनांत होते. परंतु १९५७ साल जवळ आल्याबरोबर ते किंतु दूर झाले. या वेळीं पळणीला सर्वोदय-मित्र-मंडळी विचार-विनिमयासाठीं जमली होती तेव्हां त्यांनीं निर्णय घेतला कीं आतां भूदान-यज्ञानें स्वावलंबी, म्हणजे च सर्व-जनावलंबी, झालें पाहिजे. क्रतूंतून यज्ञ आणि यज्ञांतून स्वधा हा क्रम च आहे. "अहं क्रतुः, अहं यज्ञः, स्वधा अहम्"

या निर्णयामुळें आतां जनशक्तीचे अनंत स्रोत वाहूं लागतील. स्वधा –म्हणजे आत्मधारणशक्ति – एक आंतरिक शक्ति आहे. त्यामुळें हे स्रोत कशा रीतीनें वाहूं लागतील याचा अंदाज करतां येत नाहीं. "जस जसा नवा आधार मिळत जाईल तस तसें सहज च संचित गळून पडत जाईल" हा विचार विचार नसून तें अेक मोहचक्र आहे.

असंग-शस्त्रेण दृढेन छित्वा
ततः पदं तत् परिमार्गितव्यम्

आधीं अनासक्तीनें छेद करा आणि नंतर शोध करा, ही आहे क्रांतीची प्रक्रिया. आतां शक्तीचा शोध आमचे हनुमान करतील अशी मला उमेद आहे. ज्या मातेनें लाखो हातांनीं भूमिदान दिलें आहे ती औदार्यमूर्ति आहे. जो मागण्याची हिंमत बाळगतो त्याला ती देते. आम्हीं जर संचिताचा आश्रय घेतला नसता तर न मागतां हि तिनें दिलें असतें. परंतु तें आम्हांला सुचलें नाहीं. ज्या परिस्थितींत आम्ही होतों त्या परिस्थितींत तें सुचण्यासारखें हि नव्हतें. आतां सुचलें आहे तर मागावें लागेल, आणि मिळेल हि.

पडाव कणक्कम्पट्टी, २३–११–५६ —विनोबा

: ४ :

# निधि कीं राम-सन्निधि ?

साडे पांच वर्षें भूदानाच्या चळवळीला झालीं. साऱ्या भारतांत ही पसरली. कोणत्या हि राजकीय पक्षातर्फें या चळवळीचें संचालन झालें नाहीं. म्हणून या चळवळीचें आतांपर्यंत स्वरूप जन-आंदोलनासारखें च राहिलें. जनतेनें खूप उत्साह दाखविला. पुष्कळ नवीन कार्यकर्ते या कामीं लाभले. मी त्या कार्यकर्त्यांना म्हणत असतों कीं रामाचें काम वानरांनीं च केलें कृष्णाचें काम गवळ्याच्या पोरांनीं केलें. येशू ख्रिस्ताचें काम सुतारांनीं आणि कोळ्यांनीं केलें. परमेश्वराची काम करण्याची ही अशी च तऱ्हा असते. छोट्या लोकांकरवी तो काम करून घेतो. मोठी मंडळी नंतर त्या कामाला आशीर्वाद देतात.

मोठ्या मंडळींच्या मागें कामें फार असतात. नव्या कामासाठीं त्यांच्यापाशीं वेळ हि कमी असतो. शिवाय जुनें काम सोडून नवें काम घेण्याची गोष्ट हातांत अनासक्तीची तलवार असलेला बाबासारखा मनुष्य च करूं शकतो. एकदां गांधीजींनीं पवनारहून मला सेवाग्रामला भेटण्यासाठीं बोलावलें. आम्ही चार सहा महिन्यांत एकमेकांना भेटलों नव्हतों. गांधीजींनीं कशासाठीं बोलावलें आहे याची मला कल्पना नव्हती. भेटल्यावर त्यांनीं विचारलें "व्यक्तिगत सत्याग्रहासाठीं तुला पाठवावें असें म्हणतों. हा सत्याग्रह किती दिवस चालेल सांगतां येत नाहीं. तुझ्या मागें कामें तर पुष्कळ असतील. तूं ती सोडून या कामासाठीं मोकळा होऊं शकतोस कां ?" मीं उत्तर दिलें "मोकळा होऊं शकतो कां हा प्रश्न च नाहीं. तुम्ही

[ ओडुन छत्रम्‌च्या (मदुरा) व्याख्यानांतून २५-११-५६ ]

सांगाल तर च पवनारला परत जाईन. नाहीं तर हा इथें आतां च बसतों. यमाकडचें बोलावणें आलें तर तयारीसाठीं वेळ थोडा च मिळत असतो ! तुमच्याकडून बोलावणें आल्यानंतर मला वेळ मागून घेण्याची मुळीं च जरूर नाहीं." आणि माझीं कामें सोडून मी सत्याग्रहाला बाहेर पडलों.

या वेळीं भूदानाच्या कामाचें हि तसें च झालें. तीस वर्षेंपर्यंत अनेक प्रकारचीं रचनात्मक कामें करीत होतों. परंतु हें भूदानचें काम पाहून मीं ओळखलें कीं यांत शक्तीचा स्रोत आहे. लगे च सर्व कामें आणि त्यांची चिंता सोडून या कामांत पडलों. हें मी कशामुळें करूं शकतों ? कारण हें च कीं माझा ईश्वरावर विश्वास आहे. जगाच्या कामांची जबाबदारी घेणारा तो बसलेला आहे. त्यामुळें समोर असलेल्या कामांत वेळ देऊन इतर कामांचें कसें होईल ही चिंता सोडून द्यायची असा विचार करून बाबा यांत पडला. शिवाय बाबाची गणना मोठ्या मंडळींत होत नाहीं. म्हणून हि तो त्या कामांतून मोकळा होऊं शकला.

माझा हा स्वभाव च बनून गेला आहे कीं जुन्या कामांच्या जंजाळांतून मोकळे होऊन नवीन काम अंगावर घ्यायचें. या स्वभावामुळें च पळणीला एक नवीन उपक्रम आम्हीं केला. भूदानाच्या कामांत पूर्ण वेळ देणारे वैतनिक कार्यकर्ते सुमारे अकरा बाराशें आहेत. आंशिक वेळ देऊन अवैतनिक काम करणारे सहा सात हजार तरी कार्यकर्ते असतील. पळणीला असा निर्णय घेण्यांत आला कीं भूदानच्या वैतनिक कार्यकर्त्यांचें वेतन यापुढें गांधी-निधी-कडून घेण्याचें बंद करावें. प्रश्न उभा राहिला कीं सबंध हिंदुस्थानांत चाललेली ही भूदानाची चळवळ आतां पुढें कशी चालणार ? माझ्या मनांत त्याचें उत्तर हें आहे कीं जो परमेश्वर तोडण्याची

बुद्धि देतो तो च जोडण्याची हि देणार आहे. या निर्णयानंतर देशांतील सर्व रचनात्मक कार्यकर्ते आणि इतर लोक खडबडून जागे होतील. बाबानें एवढ्या मोठ्या चळवळीचा आर्थिक आधार तोडलेला पाहून ते म्हणतील कीं आतां भूदानाच्या चळवळीची लाज बाबाची लाज नसून साऱ्या देशाची आणि साऱ्या रचनात्मक कामाची लाज आहे. म्हणून निधीचा आधार तोडल्यामुळें जर ही चळवळ बंद पडली तर आम्हां सर्वांची लाज जाणार आहे. मग ते लोक थोडे च चुप बसणार आहेत ?

आज पांच जणांनीं येथें दान दिलें. जे दान देतात त्यांनीं च पुढें भूदानाचें कार्य हातीं घ्यायचें आहे असें मी म्हणत असतों. जंगली हत्तींना पकडायला पाळीव हत्ती पाठवितात त्या प्रमाणें. परंतु ते खरे खुरे हत्ती असले पाहिजेत. त्यांना सोंड इत्यादि सर्व बरोबर हवें. हत्तीच्या नांवाखालीं म्हैस पाठवून काम नाहीं होणार. आणि दात्यानें सहावा हिस्सा दिला तर च ती हत्तीची सोंड ठरते. आजच्या दात्यांनीं सुरवातीला कमी दिलें होतें. एकाचा सहावा हिस्सा २२ एकर होत होता. त्यानें ११ एकर दिली होती. मी एक च वाक्य बोललों. "सहावा हिस्सा होण्यासाठीं दुप्पट आंकडा करून टाका." त्यानें हि "ठीक आहे" म्हटलें आणि २२ एकर जमीन दिली. मग मीं त्यांना म्हटलें कीं "आतां तुम्ही भूदानाचे कार्यकर्ते झालात. घरचें खाऊन भूदानाचा झेंडा हातांत घ्यायचा आणि काम करायचें" याप्रमाणें त्यांनीं नंतर लिहून दिलें.

तिरुकुरळमधें विरुंदोबळ आदेश देऊन राहिला आहे कीं "अतिथींना खाऊं घाला." त्यामुळें तामिळनाडमधें तर कार्यकर्त्यांना खेडोपाडीं जरूर भोजन मिळणार आहे. आमचे कार्यकर्ते म्हणतील कीं "जमीन मिळाल्याशिवाय आम्ही जेवत नाहीं" लोक विचारतील

"किती जमीन मिळाली म्हणजे जेवाल ?" कार्यकर्ता म्हणेल कीं "सहावा हिस्सा." लोक सहावा हिस्सा देतील आणि त्याला जेवूं घालतील. अशा रीतीनें निधीच्या आधाराची कांहीं जरूर च नाहीं.

भारतामधें एक मोठी संस्था आहे. तिला भिक्षा म्हणतात. ती संस्था आहे त्या प्रमाणें तें विधान हि आहे. इतर देशांत भिक्षा मागणें गुन्हा समजला जातो. आमच्या इथें जर तो गुन्हा मानला तर धर्म च गुन्हा मानल्यासारखें होईल. हिंदुस्थानांत भिक्षा मागणें हा कांहीं लोकांचा धर्म आहे. भिक्षा मागणें गुन्हा ठरला तर बाबा काय करील ? बाबा भिक्षा मिळाली तर च जेवतो. मग कायदा कागदांत राहील आणि लोक बाबाला जेवूं घालतील.

आपण जर एका च व्यक्तीचें अन्न खाल्लें तर त्याच्या पाप-पुण्याचा भार आपल्यावर येतो. सर्वांच्या घरांतून थोडें थोडें खाल्लें तर त्या त्या व्यक्तींच्या पाप-पुण्याचा भार आपल्यावर येत नाहीं ही भिक्षेंतली खुबी आहे.

भिक्षेचा खरा अर्थ हि समजून घेतला पाहिजे. काम न करतां खाणें याला भिक्षा म्हणत नाहींत. ती भीक झाली. भीक वेगळी भिक्षा वेगळी. एखादा मजूर आठ आण्याची मजुरी करतो आणि आठ आणे कमवितो. परंतु भिक्षा-धर्मी दोन हजार रुपयांची सेवा करून आठ च आण्याचें खाईल.

शंकराचार्य ज्ञान-प्रचार करीत फिरत आणि भिक्षा मागत. रामानुज हि फिरत आणि भिक्षा मागत. रामानुज एका घरीं भिक्षा मागायला गेले. पण दरवाजा बंद होता. आतां भिक्षा कशी मिळणार ? त्यांनीं भजन म्हणायला सुरवात केली. "हे लक्ष्मी देवी, भगवान विष्णूचा दास तुझ्या दाराशीं आला आहे. बाहेर येऊन त्याला भिक्षा दे." (विनोबांनीं तें संबंध तमिळ भजन त्या च

भाषेंत गाऊन दाखविलें) भजन ऐकतां च घरांतील लक्ष्मी बाहेर आली आणि रामानुजांच्या झोळींत तांदूळ घालून गेली. रामानुजांनीं त्या स्त्रीला सामान्य स्त्री न मानतां विष्णु-पत्नी लक्ष्मी मानलें. अशा रीतीनें भिक्षा देणाराला जो भगवान विष्णु किंवा लक्ष्मी समजतो आणि स्वत:ला विष्णु-दास समजून ती भिक्षा घेतो त्याला कोणत्या हि प्रकारचें पाप लागत नाहीं. ज्यानें खाऊं घातलें तो दुर्जन असूं च शकत नाहीं. तो भगवान च आहे. ही भावना ज्याच्या चित्तांत स्थिर झाली त्याला जगांत सर्वत्र विष्णूचें च अन्न खायला मिळतें. आणि नारायण-सेवकाला भिक्षेचा अधिकार आहे. या च आधारावर आजपर्यंत हिंदुस्थानांत हजारों यात्रा झाल्या. बुद्ध भगवान, महावीर, चैतन्य प्रभु, गुरु नानक इत्यादींचे शिष्य हिंदुस्थानभर फिरले ते या च आधारावर. हा आमच्या पूर्वजांचा आधार आमच्यापासून कोण हिरावून घेणार आहे ?

म्हणून आतां यापुढें भिक्षेच्या आधारावर भूदानाची चळवळ चालायची आहे. जमीन लोक च देणार आहेत. आणि कार्यकर्त्यांना जीवनाचा आधार हि ते च देणार आहेत. आंध्रमधें मीं एक सुंदर भजन ऐकलें. त्यागराजांचें तें आहे. ते विचारतात " निधि आणि राम संन्निधि यांत अधिक सुखदायक काय आहे ?" म्हणून जेव्हां पासून हा ठराव झाला आहे तेव्हांपासून माझ्या शरीरांत विजेचा संचार झाला आहे. आतां जो भेटेल त्याला भगवान रामचंद्र समजून सांगेन कीं सहाव्या हिश्याचें दान दे आणि भूदानाच्या कामाला लाग. समोरच्याला रामस्वरूप ओळखणें याला च म्हणायचें राम-संन्निधि.

---

: ५ :

# लोक-सेवकाची प्रतिज्ञा

( १ ) सत्य, अहिंसा, आणि अपरिग्रह यांत माझी दृढ निष्ठा आहे. आणि तदनुसार जीवनयापन करण्याचा मी प्रयत्न करीन.

( २ ) लोकनीतीची स्थापना झाली तर च जगांत खरी स्वतंत्रता नांदेल असा माझा विश्वास आहे. म्हणून मी कोणत्या हि राजकीय पक्षाशीं संबंध ठेवणार नाहीं आणि सत्तेच्या राजकारणांत भाग घेणार नाहीं.

( ३ ) मी कोणत्या हि जाति, वर्ग आणि पंथ ( कास्ट, क्लास आणि क्रीड ) चा भेद मानणार नाही.

( ४ ) कोणती हि कामना न ठेवतां समर्पण-बुद्धिपूर्वक मी लोकसेवा करीत राहीन.

( ५ ) मी माझा जास्तीत जास्त वेळ आणि माझें चिंतन-सर्वस्व सर्वोदयाच्या म्हणजे च भूदान मूलक ग्रामोद्योग प्रधान अहिंसक क्रांतीच्या कामीं खर्च करीन.

: ६ :

# कार्यकर्त्यांच्या योजनेचे अष्टविध प्रकार

कांग्रेस कमिटचा ज्याप्रमाणें जिल्ह्या जिल्ह्यांतून आहेत त्याप्रमाणें च भूदान समित्यांची हि योजना आहे. परंतु काँग्रेस, साम्यवादी, समाजवादी हे जसे राजकीय पक्ष आहेत तसा भूदानाचा कोणता राजकीय पक्ष नाहीं. भूदान हा राजनीतीचा विचार नसून लोकनीतीचा विचार आहे.

तथापि या वेळीं पळणीला स. से. संघानें ठरविलें कीं या जिल्ह्या जिल्ह्याच्या भूदान समित्यांचें हि विसर्जन करायचें आणि भूदानाचें काम जनतेवर सोंपवून द्यायचें.

दुसरी गोष्ट ही ठरविली कीं वैतनिक कार्यकर्ते ठेवून त्यांना जो गांधी-निधींतून पैसा देण्यांत येत असे तो बंद करण्यांत यावा.

गांधीनिधि गांधीजींच्या स्मृतिनिमित्त जमा करण्यांत आला होता. भूदानयज्ञाच्या द्वारें गांधीजींची स्मृति फार चांगल्या रीतीनें प्रकट होत आहे. त्यामुळें गांधीनिधिवाले प्रेमानें पैसा देत होते. परंतु या रकमेचा उपयोग न करण्याचें ठरविण्यांत एक विचार आहे. गांधीनिधि हा संचित निधी आहे. म्हणजे अगाऊ जमा करून ठेवलेला निधि आहे. जुन्या पुण्याच्या भांडवलावर जो काम करतो त्याचा नवीन पुण्य संपादनाचा मार्ग कधीं कधीं कुंठित होतो. म्हणून संचित निधीचा आधार सोडून लोकांचा आधार पतकरला.

वैतनिक कार्यकर्ते पूर्ण वेळ देत. परंतु त्यांची संख्या थोडी होती. अवैतनिक कार्यकर्ते आंशिक वेळ देत परंतु त्यांची संख्या

---

[ छत्रमपट्टी (मदुरा) येथील भाषणांतून. २४–११–५६ ]

दसपट होती. अवैतनिकांमधून हि कांहीं लोक पूर्ण वेळ देणारे आहेत. परंतु वैतनिक-अवैतनिक हा भेद च आतां मिटवायचा आहे.

या सर्व निर्णयाचा काय अर्थ होतो ? आतां आपण सारे नारायणाचे अनन्य सेवक बनलों. तुम्ही सर्व नारायण आहांत तुम्ही च हें काम उचलून घ्यायचें आहे. तें कशा प्रकारें ? अनेक प्रकार त्याचे संभवतात.

**परिवारांतून एक व्यक्ति**

पहिला प्रकार असा कीं प्रत्येक परिवारांतून एकेक व्यक्ति भूदानाच्या कमासाठीं मिळावी. या व्यक्तीच्या निर्वाहाची जबाबदारी त्याच्या इतर भावांनीं संभाळायची.

गेल्या एक दीड वर्षापासून निधिमुक्तीचा विचार माझ्या मनांत घोळत होता. परिवारांतून एक माणूस भूदानासाठीं मोकळा व्हावा हा विचार एकदां मी राजेंद्रबाबूंजवळ बोललों. ते म्हणाले "मला याचा अनुभव आहे. माझ्या घरीं माझे इतर भाऊ घर पाहत होते म्हणून च मी देशसेवेसाठीं मोकळा होऊं शकलों." राजेंद्रबाबूंचें उदाहरण फार मोठें झालें. परंतु याचें अनुकरण इतर करूं शकतात.

**हें हि एक रचनात्मक काम समजावें**

दुसरा प्रकार असा. आज निरनिराळ्या रचनात्मक कामांत असलेल्या कार्यकर्त्यांची आजीविका त्या त्या संस्थांमार्फत चालते च आहे. भूदान हें आपल्या रचनात्मक कामाचें च एक अंग आहे असें त्यांनीं समजून काम करावें. भूदानाच्या आणि ग्रामदानाच्या मदतीनें रचनात्मक कामाला तेज च चढेल.

**मित्रांनीं संपत्तिदान द्यावें**

तिसरा प्रकार असा. सर्वोदय-विचारावर श्रद्धा असणाऱ्या कित्येक मित्रांना घरगुती कारणांमुळें भूदानाच्या कामांत वेळ देतां

येत नाहीं. परंतु त्यांनीं आपल्यापैकीं एखाद्याला या कामासाठीं मोकळें करून स्वतःच्या संपत्तींतील हिस्सा त्याला देऊन त्याचा निर्वाह चालवावा. सर्वोदय-मित्र मंडळानें अशा प्रकारें एक मित्र भूदानासाठीं द्यावा.

**विद्यार्थ्यांतून सेवक**

चौथा प्रकार असा. ठिकठिकाणच्या शाळांतील शिक्षकांनीं सर्वोदयाचें उत्तम अध्ययन करून आपल्या विद्यार्थ्यांना त्यांत प्रवीण करावें. आपल्या पगारांतून कांहीं हिस्सा देऊन अशा एखाद्या प्रवीण विद्यार्थ्याला भूदानाच्या कामासाठीं शिक्षकवर्गानें पाठवावें.

**राजकीय पक्षांनीं माणूस द्यावा**

पांचवा प्रकार असा. सर्व राजकीय पक्षांना भूदान मान्य आहे. आपल्यापैकीं कांहीं लोकांवर त्यांनीं भूदानाची जबाबदारी सोंपवावी. तामिलनाड कॉंग्रेस कमिटीनें असें च केलें आहे. त्यांनीं गिरि महाराजांना भूदानाची जबाबदारी सोंपवली आहे.

**खेड्यांतून धान्यरूपानें दान द्यावें**

सहावा प्रकार असा. खेड्यांतील लोकांनीं आपल्या धान्यांतून थोडें थोडें देऊन मासिक पन्नास रूपयांपर्यंतचें धान्य एखाद्या कार्यकर्त्याला द्यावें. खेड्यांत येणाऱ्या कार्यकर्त्याचें फार मोठें कुटुंब असणार नाहीं. दहा गांवांतून मिळून एक कार्यकर्ता ठेवायचें म्हटलें तर एका गांवाच्या वाटचाला ५ रु. चें धान्य येतें. हा भार जास्त नाहीं. हा कार्यकर्ता राजकारणाच्या भानगडींत पडणार नाहीं, निवडणुकींत भाग घेणार नाहीं, अहिंसा-सत्य-अपरिग्रह इत्यादि व्रतें पाळणारा तो असेल, लोकनीतीवर निष्ठा असणारा असेल, निष्काम सेवा करणारा असेल. असा सेवक खेड्यांना प्रिय होईल आणि त्यांचा विश्वासपात्र बनेल.

**दात्यांनीं च कार्यकर्ता बनावें**

सातवा प्रकार असा. आतांपर्यंत जवळपास पांच लाखांहून अधिक लोकांनीं दानपत्रें दिलीं आहेत. त्यांनीं आपल्या टोळ्या बनवाव्या. सगळ्या दात्यांना भूदानाच्या कामांत पडणें शक्य न झालें तरी शंभरांतून एक या प्रमाणें पांच लाखांतून पांच हजार कार्यकर्ते पूर्ण वेळ देऊं शकतात. ही फार मोठी शक्ति होईल. इतर दात्यांनीं आंशिक वेळ द्यावा.

**व्यापाऱ्यांनीं हिस्सा द्यावा**

आठवा प्रकार असा. प्रत्येक व्यापाऱ्यानें एका कार्यकर्त्याचा निर्वाह-व्यय द्यावा. व्यापारी गांवचें अन्न खातो तर गांवाची सेवा त्यानें केली च पाहिजे. एका कार्यकर्त्याचा निर्वाह जर त्यानें भागविला तर सार्वजनिक सेवेचें पुण्य हि त्याला लाभेल.

अशा रीतीनें कार्यकर्त्यांची सेना उभी करण्याचे अनेक प्रकार होऊं शकतात. प्रत्यक्ष जनतेच्या आधारावर जर कार्यकर्ता वर्ग उभा केला तर तो सर्व दृष्टींनीं लायक असा च बनेल. कारण कार्यकर्ता चांगला नसेल तर लोक त्याला मदत देणार नाहींत.

निधीचा आधार तोडण्याची तारीख ३१ डिसेंबर १९५६ आहे. अजून एक महिना शिल्लक आहे. या एका महिन्यांत हजारोंच्या संख्येनें कार्यकर्ते उभे करतां येतील. हिंदुस्थानच्या जनतेंत खूप प्रेम भरलेलें आहे. काम न करतां भीक मागणारांना देखील ही जनता पोसते तर काम करणारांना ती पोसणार नाहीं असें थोडें च होणार आहे ?

# सर्व-सेवा-संघाचे ठराव

[ पळणी– संमेलनामधें विनोबांच्या संस्मरणीय भाषणानंतर सर्व-सेवा-संघानें २१–११–५६ रोजीं रात्रीं पुढील ठराव केले ]

(१) भूदान-यज्ञाच्या कामासाठीं प्रांतिक समित्या व प्रांतिक संयोजक आणि त्यांच्या अंतर्गत जिल्हा समित्या आणि जिल्हा संयोजक इत्यादि जें तंत्र आतांपर्यंत उभें करण्यांत आलें होतें त्याचें जानेवारी १९५७ पासून विसर्जन करण्यांत यावें.

(२) जानेवारी १९५७ पासून गांधी-स्मारक निधि किंवा इतर कोणता हि केंद्रित निधि यांच्याकडून मदत घेण्याचें बंद करण्यांत यावें.

पदयात्रा, शिबिरें, सभासंमेलनें इत्यादीसाठीं स्थानिक मंडळी व्यवस्था करूं शकतात आणि त्यांनीं तशी करावी हि. परंतु त्याशिवाय भूदानकार्यासाठीं वर्गणी देखील गोळा करण्यांत येऊं नये.

(३) अशा प्रकारें निधि-मुक्ति झाल्यानंतर भूदान-यज्ञाच्या कार्यासाठीं पुढील लोकाधिष्ठित किंवा श्रमाधिष्ठित मार्गांचा अवलंब केला जाईल.

१. संपत्तिदान २. सूतांजलि ३. सूत्रदान ४. अन्न-दान ५. साहित्य-विक्रीमधील कमिशन

(४) ग्राम-निर्माणाच्या कार्यासाठीं संचित निधि, संपत्ति-दान, साधन-दान, त्या च प्रमाणें सरकारी किंवा अन्य पैशांचा उपयोग करतां येईल.

———०———

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक



भूदान-यज्ञाच्या कार्यपद्धतींतील वरील फरकाबरोबर च भूदान-यज्ञाच्या कार्यकर्त्यांबाबत सर्व-सेवा-संघानें पुढील ठराव केला आहे.

(५) " एकेका जिल्ह्याची जबाबदारी उचलण्यासाठीं पुढील प्रकारची निष्ठा असलेल्या सेवकांची योजना करावी.

(अ) सत्य, अहिंसा, आणि अपरिग्रह यांवर ज्यांचा विश्वास असून त्यानुसार जीवन व्यतीत करण्याचा जे प्रयत्न करीत आहेत.

(आ) ज्यांची पक्षातीत लोकनीतीवर निष्ठा आहे आणि जे पक्षीय राजकारणापासून आणि तत्संबद्ध सर्व प्रकारच्या निवडणुकां-पासून मुक्त आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११५००

(इ) ज्यांची निष्काम वृत्तीनें सेवा करण्याची भावना आहे.

अशा जिल्हा-सेवकांना सेवेशिवाय अन्य कोणत्या हि प्रकारची सत्ता अथवा अधिकार असणार नाहीं. स्वतः पक्षातीत असल्यांमुळें सर्व पक्षांचा सहकार मिळविण्याचा ते प्रयत्न करतील आणि सरळ सर्व-सेवा-संघाशीं संबंधित राहतील. भूदान समितीच्या नांवानें कोणती हि संघटना ते उभी करणार नाहींत. गांवोगांव दाता, आदाता (दान ग्रहण करणारे) आणि स्थानिक लोक यांच्या समित्या भूदानाच्या कामासाठीं बनूं शकतात. अशा ग्राम-समित्यांनीं भूदानाची चळवळ उचलून धरावी.

(६) सर्वोदयाच्या आणि विशेषतः भूदानयज्ञाच्या साहित्य-प्रकाशनासाठीं आणि प्रचारासाठीं प्रत्येक भाषेसाठीं एक प्रकाशन समिति बनविण्यांत यावी. या समित्यांनीं च दानपत्राचे फॉर्म इत्यादि साहित्य पुरवावें. जिल्हा-सेवक आणि ग्राम-समित्या यांनीं आपल्या कामाचे अहवाल वेळोवेळीं सर्व-सेवा-संघाकडे पाठवितांना

त्यांची एक प्रत त्या त्या भाषेच्या प्रकाशन समितीकडे हि पाठवावी. ही समिति भूदान-यज्ञाच्या माहितीचें संकलन आपापल्या भाषेंतून वेळोवेळीं प्रकाशित करील.

(७) सध्यां विनोबाजींच्या निर्देशानुसार संपत्तिदानाच्या रकमेचा उपयोग भूमिहीनांना साधनदान, कार्यकर्त्यांना निर्वाहवेतन, आणि सर्वोदय साहित्याचा प्रचार; या तीन कामांत केला जातो. परंतु संपत्तिदानाचें काम व्यापक व्हावें या दृष्टीनें त्या दानाचा विनियोग करण्याचें दात्यावर च सोंपवावें. दात्यावर विनियोगाबाबत केवळ अहिंसक अर्थात् वैचारिक अंकुश असावा. संपत्तिदात्यांच्या मार्गदर्शनासाठीं पुढील मुद्दे ठरविण्यांत आले.

भूदान-यज्ञमूलक, ग्रामोद्योगप्रधान, अहिंसक क्रांतीच्या उद्देश्यपूर्तीसाठीं संपत्तिदानाचा विनियोग करण्यांत यावा. या उद्देश्यपूर्तीच्या उदाहरणादाखल कांहीं बाबी अशा—

[अ] भूमि-हीनांना साधनसामुग्री मिळवून देणें. जमिनीची मशागत करण्यांत मदत करणें

[आ] भूदान-यज्ञाची चळवळ चालविण्याच्या कामीं खर्च करणें

[इ] सर्वोदय-साहित्याचा प्रचार करणें

[ई] ज्या विद्यार्थ्यांनीं आणि मजुरांनीं लहान रकमांचें संपत्तिदान दिलें आहे त्यांनीं आपल्या वर्गांमधें भूदान-यज्ञमूलक क्रांतीचें काम पुढें नेण्याच्या कामीं सामूहिक रीतीनें अथवा व्यक्तिशः खर्च करावा. या कामीं जिल्हा-सेवकांची सल्ला ते घेऊं शकतात.

संपत्ति-दानापैकीं $^1/_3$ रकम दात्याला आपल्या इच्छेप्रमाणें सार्वजनिक हिताच्या कार्यासाठीं खर्च करण्याची मोकळीक यापुढें हि चालू राहील.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत
अनुक्रम 21735 ...... दि: 17-7-59
क्रमांक 9228 ...... नोंः दिः 7-8-?

# पुढील कामाचा सर्व-सेवा-संघाचा आराखडा

वरील ठरावांच्या अनुरोधानें सर्व-सेवा-संघानें एक कार्य-क्रमाचा आराखडा तयार केला. तो पुढें दिला आहे.

(१) भूदानाच्या चळवळीचा संबंध चेतनाशीं म्हणजे व्यक्तीशीं असावा. विनोबांनीं निर्देश केलेल्या त्रिविध निष्ठेनुसार एकेका जिल्हयाचें अथवा त्याहून छोटया क्षेत्राचें काम अंगावर घेणाऱ्या कार्यकर्त्यांनीं पुढें यावें.

(२) जिल्हा-सेवकांची मंजुरी सर्व-सेवा-संघाकडून मिळवावी.

(३) लोक-सेवक केवळ या च कामांत वेळ देणारे असावेत. इतर कार्याच्या प्रत्यक्ष संचालनाची जबाबदारी त्यांच्यावर नसावी.

(४) जिल्हा-सेवक हिशोब, रेकॉर्ड इत्यादि भूदानाचें दप्तर (कार्यालय) शक्य तों स्थानिक रचनात्मक संस्थांकडे सोंपवील किंवा तें न जमलें तर इतर व्यक्तीकडे सोंपवील. या कार्यालयाला जिल्हा-सर्वोदय-कार्यालय असें नांव रहावें.

(५) रचनात्मक संस्था, शिक्षण-संस्था, निरनिराळे पक्ष इत्यादींमधून आणि परिवारांतून हि कार्यकर्ते मिळविण्याचा प्रयत्न करावा. जिल्हयाचा सर्व खर्च संपत्तिदान, सूतांजलि इत्यादि मार्गानें भागवावा.

(६) गांवोगांव ज्या ग्रामसमित्या स्थापन करायच्या त्यांत दात्यांचा समावेश असावा. गांवाच्या एकम् (यूनिट) पेक्षां मोठी समिति उपयोगाची नाहीं.

(७) प्रांता-प्रांतामधील कामामधें समन्वय आणि सुसूत्रता असणें इष्ट आहे. जिल्हा-सेवकाचा सरळ संबंध स. से. संघाशीं असला तरी प्रांतीय किंवा त्याहून लहान क्षेत्रांत स्वेच्छेनें परस्पर सहयोग आणि परस्पर विचारविनिमय इत्यादीची व्यवस्था तो करूं शकतो. ज्या जिल्ह्यांत सेवक नसतील त्या जिल्ह्याबाबत आसपासच्या जिल्हा-सेवकांनीं मिळून विचार करावा.

(८) प्रांताप्रांतांतून आश्रमासारखी कांहीं केन्द्रें असावींत. त्या ठिकाणीं सत्य, अहिंसा, अपरिग्रह इत्यादि व्रतानुसार जीवन घालविणें अध्ययन, चिंतन करणें आणि विचार-विनिमय करणें यासाठीं मधूनमधून कार्यकर्त्यांना राहतां यावें. शक्य तर जिल्हा-वार हि अशीं स्थानें असावींत.

क्र. ११५००

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम 28735 विः निबंध
क्रमांक 1282 नोंः दिः 17/7/56

REFBK-0011500

# आगामी प्रकाशनें

(१) भूदान-गंगा [ विनोबा ]

भाग १ आणि भाग २

(२) साहित्यिकांशीं हितगुज [ विनोबा ]

(३) माझी हिमालय यात्रा [ महादेवीताई ]

(४) सर्वोदय-विचार आणि स्वराज्य-शास्त्र [ विनोबा ]

(५) धर्म-सार ( भगवान् बुद्धदेवाच्या धर्मपदाचें सार )
[ शिवाजी ]

(६) गुरु-बोध ( शंकराचार्यांच्या प्रकरणग्रंथाचें नवनीत )
[ विनोबा ]